

# माणूस

साप्ताहिक

२४ सप्टेंबर १९६६ चालीस पैसे



'शॉ'च्या प्रा. हिजिन्ससाठीच जन्मलेला
रेक्स हॅरीसन


खेडवळ फुलवालीही शहरी
'लेडी'
होत आहे
ऑड्रीने स्वीकारलेले एक आव्हान
माय फेअर लेडी





## एक समग्र साप्ताहिक

वर्ष – सहावे
अंक : बारावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**व्यवस्था विभाग**
अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४९१ नारायण, पुणे २.

दूरध्वनी – ५७३५१


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ‘माणूस’ साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# पत्र – मैत्री

स. न. सप्टेंबर, १३

मी ‘माणूस’चा नियमित वाचक आहे. ‘माणूस’ साप्ताहिक खरोखरच माणुसकीला धरून आहे. त्याचे कितीही स्तुतिपाठ गायिले तरी ते थोडेच आहेत.

मला एक गोष्ट मात्र खटकते. ‘माणूस’ सर्व बाजूंनी संपन्न आहे. त्यात काव्य आहे, परीक्षण आहे, उत्स्फूर्त करण्यासाठी ‘मोहन रानडे’सारख्यांचे चरित्र आहे. सामान्य माणसाला राजकारण समजावून देण्यासारखे लेख आहेत. पण ज्या सध्याच्या काळात लोकांमध्ये व्यायामाची आस्था नाही, त्या लोकांमध्ये व्यायामाची गोडी निर्माण करण्यासाठी आपण व्यायामाविषयी किंवा कोणत्याही देशी खेळांविषयी जरूर ती माहिती देण्याचे ठरवले तर फार बरे होईल.

आपणांस व आपण स्थापिलेल्या ‘माणूस प्रतिष्ठान’ यांस शुभेच्छा चिंतितो.

**दिवाकर देशपांडे,** अंबरनाथ

स. न. सप्टेंबर, १२

आपल्या लोकप्रिय ‘माणूस – एक समग्र साप्ताहिका’चा मी प्रथमपासूनचा ग्राहक आहे. आपण माणूस प्रतिष्ठान हा अपूर्व प्रयोग महाराष्ट्रात प्रथमच सुरू करीत आहात, ह्या धाडसाबद्दल आपले प्रथमतःच मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. मात्र हा प्रयोग कितपत यशस्वी होईल ह्याची शंकाच वाटते.

'माणूस' साप्ताहिक सुरू होऊन ५ आठवडे झाले. मात्र प्रथमतःच दर खेपेस ४० पैसे देऊनही अंकाचा प्रथमपासूनचा दर्जा कितपत राहील अशी उगाच शंका येई. ती ४-५ आठवडयांतच आपण खोटी पाडलीत ह्याबद्दल धन्यवाद! दर आठवडयास 'माणूस'चा खप कुठपर्यंत गेला हे समजण्याची उत्कंठा आहे तरी कृपया १५ ऑगस्टपासूनची 'माणूस'ची चढती कमान कशी आहे ते पुढील साप्ताहिकात आल्यास बरे! आपण 'माणूस'ची किंमत एकदम ४० पैसे केलीत त्याबद्दल काही म्हणणेच नाही, परंतु त्यातील फक्त १ पैशाऐवजी निदाम ३ अगर ५ पैसे (माझ्या मते हं!) आपण 'माणूस प्रतिष्ठान' साठी वेगळे काढले असतेत तर आपली अशक्य कोटीतील कल्पना दृष्टिक्षेपात लवकर दिसली असती असे वाटते. आपली 'माणूस पंचवार्षिक ग्राहक' योजना वाचली. परंतु सर्वसामान्य मराठी जनांना कितपत परवडेल ही माझ्या स्वतःवरून तरी मला शंका येते. कारण एकदम एवढी रक्कम मनात असूनही देता येणार नाही. साप्ताहिक मात्र हातात पडल्याबरोबर अथपासून इतिपर्यंत वाचल्याखेरीज राहवत नाही. एवढेच मात्र खरे! साप्ताहिकातील भविष्यावर बऱ्याचजणांची नापसंती दिसते. हल्लीच्या Opinion-poll च्या जमान्यात आपणही 'माणूस'च्या सर्व वाचकांचे मनोगत जाणून घ्याना! ड्रॅगन जागा झाला उत्कृष्ट. अरुण साधूंना आमचे धन्यवाद सांगा 'माणूस प्रतिष्ठान' यशस्वी होवो हीच सदिच्छा! 'माणूस'च्या निर्मितीस झटणाऱ्यांना माझा स. न.

**जगन्नाथ कुलकर्णी, ठाणे**

**स. न.** सप्टेंबर, १३

'माणूस' साप्ताहिकाचे अंक आपण आपुलकीने पाठवून दिलेत ते पोचले. त्याबद्दल मी अतिशय आभारी आहे. आपण पाठवलेले अंक मी संपूर्ण वाचू शकलो नाही. पण २० ऑगस्टच्या अंकामध्ये 'वार्तालेख–वृत्तकथा' या सदराखाली लिहिलेले छोटेसे निवेदन मी वाचले. त्यामध्ये आपण म्हटल्याप्रमाणे 'निवडक विषयावर विस्तृत वार्तालेख व वृत्तकथा प्रसिद्ध करावे असा पर्याय 'माणूस'ने स्वीकारला आहे' हे नमूद केले आहे. त्या अनुरोधाने आपण माझ्याकडे पाठविलेल्या चारही अंकांमध्ये महत्त्वाचे विषय चर्चिले आहेत. अशा वाङ्मयाची आपल्या समाजास अतिशय आवश्यकता आहे. आणि आपल्या 'माणूस' साप्ताहिकाने हे कार्य अंगिकारले आहे, ही चांगली गोष्ट आहे. आपल्या या कार्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो आणि आपल्या कार्यास सुयश चिंतितो.

**श्री. रत्नाप्पा कुंभार,** कोल्हापूर

# ठुकाफळे...



## □ कोंडाणा कशाला घेतोस बाबा !

चीनशी वाटाघाटी करण्यासाठी आपण पुढाकार घेतला पाहिजे. आपण आज चीनशी मुकाबला करण्याची तयारी ठेवली आहे. समजा, चीनकडून अक्साई चीन हा भारताचा भूभाग आपण ताकदीने हिरावून घेतला तरी त्याचा तसा काय उपयोग ? आपल्याकडून हा भूभाग पुन: हिसकेपर्यंत चीन स्वस्थ राहणार नाही.

ही अमृतवाणी कुणाची असेल ? विनोबा ? छे: छे: भूमिहीनांना भूमी मिळवून देण्याचे क्षुद्र काम तो महात्मा करत असतो. ही वाणी इतर राष्ट्रांना भारताच्या भूमीचे भूदान करणाऱ्या आपल्या पराजयप्रकाश नारायणांची आहे. या विलक्षण बुद्धिमान इसमाविषयी भारताच्या कानाकोपऱ्यांत दिवसेंदिवस आदर वाढत चालला आहे. ज्या गावात् ही विभूती जाईल तिथे प्रत्येकाने यांचे दर्शन घ्यावे. यांच्या अंगावर ' सुखी माणसाचा सदरा ' आहे. देशाची चिंता यांना सतत जाळीत असूनही सत्तेची यांना अभिलाषा नाही. यांना छंद आहे एकच. भूदानाचा ! चीनला भूदान! पाकिस्तानला भूदान! ! नागांना भूदान! ! ! कुणी ऐको वा न ऐको. सांगण्याचा माझा धंदा आहे. नुकतेच पराजयप्रकाश शेख अब्दुल्लांना भेटून आले. पंतप्रधान इंदिराजींना सांगून आले, की अब्दुल्लांना सोडा ! नाही ऐकले ! त्याचे यांना काही नाही. त्यांचा आपल्या स्वत:च्या ' दान' गट पणावर उदंड विश्वास आहे.

मागे पराजयप्रकाशांनी आयुबखानांची भेट घेतली. आयुबखानांनी त्यांना सांगितले, " काश्मीर खोऱ्यावरचा हक्क सोडून कोणतेही सरकार पाकिस्तानात टिकू शकणार नाही. " पराजयप्रकाशांनी आयुबखानांचे दु:ख ओळखले. दु:ख म्हटले की, दु:ख आपले दु:ख, परक्याचे दु:ख. हा आपपरभाव यांचेजवळ नाही. आता आपण पाकिस्तान निर्माण केले, त्या पाकिस्तानला स्थिर सरकार नको ? पराजयप्रकाशांनी म्हणूनच इंदिराजींना जाहीर सभेत खडा इशारा दिला, ' काश्मीर खोऱ्याचे भूदान करा ! '

भारतात काय, काहीही केले तरी काँग्रेस सरकार जात नाही ! इंदिराजींना हे सांगण्याचा पराजयप्रकाशांचा मुळी अधिकारच आहे. इंदिराजी नसत्या तर पराजयप्रकाशच भारताचे पंतप्रधान होणार असा जगभर एकदा गाजावाजा झालेला आहे. कुठल्याही प्रजासमाजवाद्याला विचारा पाहिजे तर !

अशा या अधिकारी व्यक्तीने इंदिराजींना सक्त बजावले आहे–

"शेखसाहेबांची मुक्तता केल्याखेरीज काश्मीरचा प्रश्न सुटणार नाही."

ताश्कंद कराराचे वेळी व आतापर्यंत भारताने आंतरराष्ट्रीय क्षेत्रात जो पवित्रा घेतला आहे की, काश्मीरचा प्रश्न असा आता शिल्लकच नाही. त्याचे बूड पराजयप्रकाशांनी उखडून टाकले! ही असामी कुणाला भिणारी नाही! चौ-एन-लायशीदेखील शेखसाहेब भारताच्या हिताविरुद्ध काहीही बोललेले नाहीत अशी ग्वाही त्यांनी दिली आहे. पराजयप्रकाश मनाचे थोर म्हणून त्यांनी अशी ग्वाही तरी दिली. नाहीतर अशा ग्वाहीची गरजच काय? चौ-एन्-लायशी समजा शेखसाहेब भारताच्या हिताविरुद्ध काही बोलले असले तरी चौ-एन्-लाय थोडाच परका आहे! चौशी वाटाघाटी करायला आपल्याला पुढाकार घ्यायचाच आहे.

महाराष्ट्र सरकारपाशी एक पगडी आहे. कुठल्याही आतापर्यंत लिहिल्या गेलेल्या शिवचरित्राला ही पगडी हललेली नाही. महाराष्ट्र सरकारने पराजयप्रकाशांना शिवचरित्राचे काम अंगावर घेण्यास सांगावे. असे फर्मास चरित्र तयार होईल! या चरित्रातली जिजाबाई शिवाजीला सांगेल–

"शिवबा, कोंडाणा कशाला रे घेतोस बाबा! सोड तो नाद. समजा, आज तू कोंडाणा घेतलास तर पुन्हा कोंडाणा घेतल्याशिवाय मोगल राहतील काय?"

खरोखर अशा समंजस भूमिकेतून आपले पूर्वज वावरले असते, कशाला गड यायला हवा आणि सिंह जायला हवा? हिंदूंचे राज्यच मुळी झाले नसते. आपल्याला निराळे पाकिस्तान करावे लागले नसते. आसेतुहिमाचल पाकिस्तानात सुखी माणसांच्या लुंग्या नेसून आपण आज फिरलो असतो. ग्यानबा असा राहिलाच नसता "शेर-ई- आळंदी" होऊन अशी 'सुलट' भाषा त्याने लिहिली नसती.

## □ पहारा

महाराष्ट्र सरकारच्या विधान परिषदेचा नागपूर अधिवेशनात गोवधबंदीच्या कायद्यावर बोलताना ना. यशवंतराव मोहिते म्हणाले–

"गोवधबंदीचा कायदा केला, तरी त्याची अंमलबजावणी करणे शक्य होणार नाही. दारूबंदी कायद्याचे काय झाले?"

ना. यशवंतराव मोहित्यांनी एका प्रश्नात दोन मंत्र्यांच्या 'दांडचा' कशा सफाईने उडविल्या पाहा. दारूबंदीमंत्री आणि गृहमंत्री यांच्या कारभाराची ही त्यांच्याच सहकाऱ्याने केलेली जाहिरात! मंत्रिमंडळाची संयुक्त जबाबदारी म्हणजे ही अशी पाहिजे! संख्याशास्त्राने विचार केला तरी सर्व धर्मांत दारू पिणारे असले तरी गोमांस खाणारे फार थोडे आहेत.. तेव्हा गोवधबंदीची अंमलबजावणी करणे अधिक सोपे आहे. असे असूनही इतर सात–आठ काँग्रेस राज्यांत जी गोवधबंदी आहेच तिथेही कायद्याची अंमलबजावणी नीट होत नाही, असेही यशवंतराव मोहित्यांचे

म्हणणे दिसते. एक–दोन वाक्यांत अनेक राज्यांतील काँग्रेसराज्ये व आपले दोन सहकारी यांच्या कर्तृत्वाचा ' हिशेब ' देण्याचे मोहित्यांचे हे कसब वाखाणण्यासारखे आहे. सर्व मंत्र्यांनी परस्परांवर अशीच नजर ठेवावी !

## □ लायसण !

भगवंतराव पिंगळे जिल्हा परिषदेला निवडणुकीसाठी उभे राहिले. काँग्रेसच्या तिकिटावर असल्याने, ते निवडून येणार यात शंकाच नव्हती. परंतु निवडणुकीचा सोहळा म्हणून ते रोज सकाळी मतदारांना भेटायला जात असत.

कुलकर्णीमास्तरांच्या घरी एके दिवशी सकाळीच भगवंतराव आले व त्यांनी 'नमस्कार' व 'हसण' झाल्यावर मत देण्याची मास्तरांना विनंती केली. भगवंतराव दारू पिऊन पडलेले असतात, अशी कुणकुण मास्तरांना होती. मास्तरांनी स्पष्टच विचारले —

" मला प्रथम हे सांगा भगवंतराव, की तुम्ही दारू वगैरे घेता का ? "

भगवंतराव चकित मुद्रेने म्हणाले–

" मास्तर तुम्ही लायसण, कधी काढलं ? "

## □ लिंकनची मुले

अब्राहम लिंकन हा एकदा आपल्या दोन मुलांना घेऊन स्प्रिंगफिल्ड गावात रस्त्याने जात होता. दोघांचे बोट त्याने धरले होते व त्याच्या दोन्ही बाजूंना एक-एक मुलगा चालत होता.

रस्त्यातून जाताना दोन्ही मुलगे रडत होते. लिंकन त्यांच्या रडण्याकडे लक्ष न देता दोघांना तसाच फरफटवीत चालत होता.

रस्त्यातून जाणाऱ्या एका माणसाने थांबून विचारले, " काहो, ही मुले रडत का चालली आहेत ?"

लिंकनने चालणे न थांबवता सांगितले,—" जगात ज्यामुळे सतत भांडणे व रडारड चालते तशीच ही रडारड आहे ! माझ्या खिशात तीनच अक्रोड आहेत आणि प्रत्येक चिरंजीवाला यांतले दोन हवे आहेत !"

—ग्यानबा

---

● घर सुटल्याखेरीज घराची किंमत कळत नाही, पैसा संपल्याखेरीज पैशाची किंमत कळत नाही आणि बायको महिला-मंडळात जाऊ लागल्याखेरीज बायकोची किंमत कळत नाही.

---

# 'माणूस'चे मुद्रक...

तशी सर्वच धंदांत राक्षसीवृत्तीची काही माणसे वावरत असतात. साधी, सरळ माणसेही धंद्यात अनेक राक्षसी चुका करीत असतात. पण 'मुद्रणा'च्याच धंद्याला 'राक्षस' या नावाचा जाच का हे अद्याप कुणाला न उलगडलेले कोडे आहे. बहुधा ब्रह्मदेवाने आपल्या जगत्ग्रंथांची सर्व प्रुफे काळजीपूर्वक तपासून दिली असता कुणा आद्य-मुद्रणमहर्षीकडून दुरुस्त्या न होताच ती छापली गेली असावीत ! चिडलेल्या ब्रह्म्याचा शाप 'मुद्राराक्षस' होऊन या व्यवसायाच्याच फक्त मानगुटीवर तेव्हापासून जो बसला आहे तो अद्याप उठायला तयार नाही.

पण अलीकडे अलीकडे मुद्रणातील राक्षसाचा अंश कमी करून ते सुधारण्याकडे, अधिक सुबक व सुंदर करण्याकडे मराठी मुद्रकांचा कल वाढत आहे, हेही काही नाकारण्यात अर्थ नाही. ब्रह्मदेव झाला तरी त्याच्या रागालाही काही मर्यादा असणारच !

ही सुधारणेची लाट आता सनातन्यांचा बालेकिल्ला असणाऱ्या पुण्यातही पसरत आहे हे नवल. पुण्यातील एकूणच व्यापार-व्यवसायात काटकसरी वृत्तीने आपल्या व्यवसायाचे बस्तान बसवण्याचा जुना खाक्या अधिक प्रिय. अधिक भांडवल ओतून, आपला माल अधिक आकर्षक व चमकदार करून तो चढ्या किंमतीला अधिक व्यापक गिऱ्हाईकवर्गापर्यंत पोहोचविण्याची झेप घेण्याऐवजी टापटिपीने, बारीक हिशेबाने, आहे त्याचीच काही उलघाल करून भागवाभागवीने धंदा करण्याचा प्रयत्न येथे विशेष जारी असतो.

हाही पुणेरी वृत्तीविशेष आता पालटत आहे. मुंबईचा असर पुण्यावरही होऊ लागला आहे. अधिक भांडवल, अधिक धडाडी, अधिक नफा हे प्रगत व्यावसायिक समीकरण पुण्यातही मूळ धरू लागले आहे. दर कमी घेऊन एकमेकांची गिऱ्हाईके मारण्याचा काळ जाऊन अधिक चांगले काम करून अधिक गिऱ्हाईकी खेचण्याची हितकर स्पर्धा मुद्रणव्यवसायात सुरू झालेली आहे.

या स्पर्धेत 'संगम' हा आज एक आघाडीवर असणारा प्रेस

## ...'संगम'चे अभिनंदन

आहे. प्रकाशकांची पुस्तके कमीत कमी दरात छापून देणे एवढीच प्रेसची इतिकर्तव्यता मानून घेण्यास 'संगम'चे चालक सुरुवातीपासूनच तयार नव्हते. अंगी धडाडी होती, चौफेर संबंध होते. त्यामुळे सुरुवातीपासूनच व्यवसायाचा पाया विस्तृत प्रमाणावर, नव्या धर्तीवर घालण्याची त्यांची धडपड होती. १९४७ मध्ये पटवर्धन बंधूंनी व्यवसायाला सुरुवात केली तीच मुळी ६ सिलिंडर मशिन्स असलेला मोठा प्रेस खरेदी करून. मग दरवर्षी त्यात यंत्र-सामग्रीची नवी भर पडत गेली ती वेगळीच. माधवराव पटवर्धन म्हणू द्यात, की मुंबईच्या मोठ्या प्रेसची कचरण निघते तेवढाही माझा धंदा वर्षाकाठी होत नाही; पण पुण्यात 'संगम'एवढी विविध प्रकारची कामे एवढ्या तडफेने करू शकणारे प्रेस मोजायला हाताची बोटेदेखील लागणार नाहीत.

'संगम' प्रेसमध्ये पाऊल ठेवले की आपण एका कारखान्यात प्रवेश करतो आहोत असा भास झाल्याशिवाय राहत नाही. रिमांचे ढिग चढले आहेत, पुस्तकांच्या गठ्ठ्यांनी वाट आडवली आहे, डावीकडच्या बांधणी खात्यात सरसाचे भले प्रचंड पातेले खदखदत आहे, अलीकडे-पलीकडे मोनो-लायनोंची धडधड सतत कानांवर पडत आहे; थेट आत मशिन खात्यात किती आणि कशा प्रकारची विविध यंत्रे आहेत कोण जाणे ! कारण खात्याच्या प्रवेश भिंतीवरच पाटी झळकत आहे-- 'प्रेस कामगारांशिवाय आत येण्यास सक्त मनाई आहे'... थोडक्यात पुण्याच्या मानाने प्रेस फार सुसज्ज आहे, अद्ययावत् आहे.

'संगम' असाच आघाडीवर ठेवण्याची चालकांची मनीषा आहे. बांधणी विभाग तर 'संगम'ने पूर्ण यांत्रिक केलाच आहे. आता ऑफसेट तंत्रातही 'संगम'ची वेगवान् प्रगती सुरू आहे. दोन वर्षांपूर्वी 'संगम'ने ऑफसेट पद्धतीने छापलेले हँडलूम हाऊसचे विविध रंगी कॅलेंडर हा मुंबईतील मुद्रणजगतातही कौतुकाचा विषय

[पृष्ठ ६३ वर

# विचारवारे — समीर

## □ विज्ञानाचे विज्ञान

आजच्या युगाला विज्ञानाचे युग म्हणतात; पण जगातल्या कुठल्याही देशाला आपण विज्ञानाचा शक्य तेवढा कल्याणकारी उपयोग करीत आहोत की नाही, याची कल्पना नाही. उदाहरणार्थ, विज्ञानावर किंवा कुठल्याही विशिष्ट शास्त्रावर किती पैसे खर्च करायचे हे कसे ठरवायचे ? सध्यातरी हा सर्व हिशेब अदमास पंचे दाहोदरसे असा चालतो. म्हणजे आजचे विज्ञानाचे अध्ययन दिशाहीन आहे. त्याला ही दिशा दाखवणे अत्यंत आवश्यक आहे. हे कार्य करणाऱ्या अगदी थोड्या मंडळींत ‘ विज्ञानाचे विज्ञान प्रतिष्ठान ’ (‘ सायन्स ऑफ् सायन्स फाउंडेशन ’) चे संचालक श्री. मॉरिस गोल्डस्मिथ आहेत व नुकत्याच दिलेल्या भारतभेटीत त्यांनी ‘ विज्ञानाचे विज्ञान ’ म्हणजे काय हे विशद केले.

‘ विज्ञानाच्या विज्ञाना ’ची दोन अंगे आहेत—एक म्हणजे विज्ञानाच्या सामाजिक अन्वयार्थाचा अभ्यास करणे. या अभ्यासामुळे समाजाच्या प्रगतीसाठी विज्ञानाचा उपयोग कसा करावा हे कळते. दुसरे म्हणजे विज्ञानाच्या ‘ आत ’ बघणे व त्याचा उपयुक्त साधन म्हणून वापर होत आहे की नाही, याची खात्री करून घेणे. या दुसऱ्या गोष्टीसाठीच विज्ञानाच्या अध्ययनात किती साधनसंपत्ती खर्च घरली हे कळले पाहिजे. ‘ विज्ञानाचे विज्ञान प्रतिष्ठान ’ ही गोष्ट शोधून काढून विज्ञानाचा उपयोग शहाणपणाने व्हावा, असा प्रयत्न करीत असते. या त्याच्या कार्यात शास्त्रज्ञ, कवी, शिक्षणतज्ज्ञ इत्यादी अनेकांचे साहाय्य होते. या प्रतिनिष्ठानातर्फे नियमितपणे परिसंवाद योजले जातात व त्यांत ‘ विज्ञानाच्या विज्ञाना ’च्या काही मूलभूत समस्यांचा विचार केला जातो. शास्त्रीय प्रगतीची पद्धतशीर आखणी करण्यासाठी जे मूलभूत अध्ययन लागते ते ‘ विज्ञानाच्या विज्ञाना ’ने मिळते. त्यामुळे भारतासारख्या प्रगतिशील देशाला तर ते फारच महत्त्वाचे आहे.

## □ विज्ञानाचे राजकारणात स्थान

विज्ञानाची दुसरी एक महत्त्वाची बाजू मांडली ती ब्रिटनचे हाय कमिशनर जॉन फ्रीमन यांनी. विज्ञानाचे राजकारणात स्थान या विषयावर गेल्या आठवड्यात नव्या दिल्लीत भाषण करताना ते म्हणाले, “कुठल्याही माणसाची विज्ञानाशी निदान तोंडओळख तरी असल्याशिवाय तो सार्वजनिक जबाबदारी अंगावर घेण्याइतका

लायक किंवा सुशिक्षित होत नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. जवळजवळ प्रत्येक महत्त्वाचा राष्ट्रीय निर्णय शास्त्रीय आधारावर घेण्यात आला पाहिजे. जरी राष्ट्रीय निर्णय घेण्याचे काम फक्त वैज्ञानिकांवर सोडता येणार नाही तरी हे निर्णय वैज्ञानिकांशी विचार–विमर्श केल्याशिवाय घेण्यात येऊ नयेत; नाहीतर ते अपक्व व असंबद्ध ठरतील."

निरनिराळ्या देशांनी विज्ञानाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत कौशल्य संपादन करण्याची आवश्यकता आहे. एखादा प्रगतिशील देश आपल्या शास्त्रीय विकासासाठी एखादे सीमित क्षेत्र ठरवून तेवढ्यातच प्रगती करू लागला तर तो भाराभर क्षेत्रांत प्रगती करू पाहणाऱ्या दुसऱ्या एखाद्या देशाइतकेच शास्त्रज्ञ पैदा करू शकेल.

हिंदुस्थानच्या दृष्टीने पाहिले तर सकस धान्याची उपज, प्रोटीनचे उत्पादन, खाऱ्या पाण्याचे गोड्या पाण्यात रूपांतर व हवामानशास्त्र हे विषय महत्त्वाचे असल्याने हिंदुस्थानने या शास्त्राच्या संशोधनाचे जागतिक केंद्र म्हणून पुढे यावे.

सरकारच्या कार्यक्षेत्रात विज्ञानाचाही अंतर्भाव होत असला तरी संशोधन-स्वातंत्र्य व विज्ञानावर होणाऱ्या खर्चावर सरकारी नियंत्रण या दोन गोष्टींमुळे बऱ्याच समस्या निर्माण होतात. बरीचशी शास्त्रे अशी आहेत, की सरकारी अनुदानाशिवाय त्यांचा विकास होणे अशक्य आहे. ब्रिटनमध्येही हीच समस्या आहे, पण तेथल्या विश्वविद्यालयांना मौलिक संशोधनाच्या बाबतीत संपूर्ण स्वातंत्र्य दिलेले असल्याने ती काहीशी सोपी झाली आहे. त्यानंतरच्या विकासासाठी लागणाऱ्या संशोधनाचा बराचसा वाटा सरकार उचलते.

## ☐ योग–सामर्थ्याचा आधुनिक उपयोग ?

मानवी शरीर पंचेंद्रियांनी सीमित झालेले असले तरी या पंचेंद्रियांच्या पलीकडची एक अतर्क्य शक्ती माणसाजवळ आहे व तिच्या जोरावर तो ज्ञान प्राप्त करून घेऊ शकतो. हा सिद्धांत हिंदुस्थानात माणसांना नवीन नसला तरी काही दिवसांपूर्वी तो मिलान रायझल् या झेक पॅरासायकॉलॉजी तज्ज्ञाने दिल्लीतील भाषणात मांडावा, हे विशेष म्हटले पाहिजे. ही शक्ती काही माणसांपुरती मर्यादित नसून सगळ्यांजवळ असते, पण ती सुप्तावस्थेत असते. ती जागृत कशी करायची हाच प्रश्न आहे.

ही शक्ती एकदा नियंत्रित होऊ शकली की माणसाला जणू सहावे इंद्रिय मिळेल व ते इतर इंद्रियांपेक्षा खूपच मोठी कामे करू शकेल. रशियन शास्त्रज्ञ तर रडार किंवा रेडिओनेही जेव्हा दूर संदेश पाठवणे अशक्य होते तेव्हा या शक्तीचा उपयोग करून संदेश पाठविता येतील काय याचा विचार करीत आहेत. आणखी एक उपयोग शिक्षण क्षेत्रात होऊ शकेल. शिक्षक या अद्‌भुत मार्गाने विद्यार्थ्याला आपले ज्ञान देऊ शकला तर ज्ञानाची देवाण–घेवाण फारच सुकर होईल; कारण मग भाषेचा अडथळा उरणार नाही. ●

## कधीतरी काहीतरी

कधीतरी काहीतरी
मुके अबोध जाणवे
सौख्यातील सुगंधही
हृदयाला न साहवे
कधीतरी काहीतरी
भाव गुंजारती कानी
काही झाले नुमजता
उगा लवते पापणी
कधीतरी काहीतरी
हृदयाला जड जाई
उमलत्या कलिकेचा
लतिकेला भार होई.
कधीतरी काहीतरी
स्वप्न पडे जागेपणी
भावचित्रांची उद्याच्या
ओढ लागे वर्तमानी
कधीतरी काहीतरी
दुःख दाटते अंतरी
आशागीत गावयाला
निराशतेची बासरी
कधीतरी काहीतरी
शल्य नाजूक सलते
फुले भावना हृदयी
परी वाणीच गोठते
कधीतरी काहीतरी
असे मनाला वाटते
गोड स्मृतींचे स्पंदन
ओठावर थरारते !

—शशिकांत फडणीस

## ओढ

मन ओढाळ ओढाळ
किती आवरू कळेना
तुझी सय आल्याविना
पुढे पाऊल चालेना ।।

मन ओढाळ ओढाळ
तुझे बोलणे आठवे ।
ओल्या जखमेवर मीठ
कुणी दुष्टाने लावले ।।

मन ओढाळ ओढाळ
धाक घालुनी शिणलो
उफाळून येई मन
जेथे आपण भेटलो ।।

मन ओढाळ ओढाळ
इच्छा एक रुतलेली
मृत्यु येता या देहाला
वेदनेला जाग यावी ।।

मन ओढाळ ओढाळ
देहातुनी मुक्त होता
राख–अश्रु मीलनी
या सयीची सांगता ।।

—राम काळे

# सुकलेली वेल

सुकलेली वेल जरा
फुलली मलूल फुले
ढळलेल्या दिवसावर
संध्येचा रंग खुले
आशेचे घट रिते न
मृगजळेचि भरलेले
पांथस्था नशीब तुझे
आडमार्ग रान खुले
स्नेहाचे दीप दूर
ऊब त्यांची पुरते ना...
फुलतेना प्रीत इथे
भाव नवा खुलतो ना
ढळलेल्या दिवसावर
वेल नवी फुललेली
रक्तातिल उष्ण रंग
अश्रूंनी ओलवली !

—*ना. दि. देशमुख*

# आस्वाद

कित्येक कवितांतले चित्रण स्पष्ट असे काही सांगत नाही. पण एक प्रकारची वृत्ती (Mood) निर्माण करते. 'सुकलेली वेल' ही या प्रकारची कविता आहे. शेवटच्या कडव्यात पुनः घेतलेली पलट थोडी विस्मयकारक वाटते की निराशेतून पुनः एक नवे जग निर्माण होते असे कवीला दाखवायचे आहे. 'रक्तातील उष्ण रंग' ही ओळ रचनेच्या दृष्टीने कर्णकटू वाटते. कारण शेवटचे अक्षर गुरू उच्चारावे लागते. बाकी रचना सुंदर गेय अशी आहे.

देशमुखांच्या चित्रणासारखेच शशिकांत फडणीस यांचे 'कधीतरी काहीतरी' हे कवन. पण तोंडावळा सारखा असला तरी आतले व्यक्तित्व खूपच वेगळे आहे. मला एक शब्द आवडला नाही. तो म्हणजे 'निराशता.' बाकी कवनातले गूढ म्हणा किंवा कोडे म्हणा अनुभवाचे वाटेल. कवीलाच नव्हे केवळ तर रसिकालासुद्धा. मन व्यथित होते ते कधी स्मृतींनी किंवा निराशेने. वेदनांचे रूप नीट कळत नाही. जाणीवेला सामर्थ्यच राहत नाहीं. पण काहीतरी नेहमीच्याहून भिन्न तरंग उमटले आहेत एवढे कळत असते. काव्य रचायलाच नव्हे तर कविता जाणायलासुद्धा अशा वृत्तीची आवश्यकता असते. म्हणूनच मी म्हणतो, फडणीसांनी कलाकाराचीच वेदना रंगविली नाही. रसिकही तीत स्वानुभूतीचे पडसाद ऐकू शकेल.

स्मृती हा अलंकार मानला आहे. राम काळे यांच्या 'ओढ' कवितेचे ते एकच लेणे आहे. पण अलंकार दाहकही होतो केव्हा केव्हा. तसे येथे झाले आहे. ओढाळ मनाला त्या मधुर स्मृतीच्या आवर्तातून बाहेर पडता येत नाही. पण ओढाळ मन या स्मृतीला विटले आहे का ? छे: मुळीच नाही. मृत्युनंतरही या स्मृतीला आयुष्य असावे असे त्याला वाटते. प्रेमाच्या स्मृतीची दाहकता आणि आकर्षण यांत अधिक प्रभावी काय असते हे सांगणे खरोखर कठीण आहे !

—*गोपीनाथ तळवलकर*

चित्रातली नदी साधी नव्हती–
माणसाला या जगातून खेचून
दुसरीकडेच घेऊन जाणारी
होती – आणि हे नावाडी ? . . .

# ती नदी वैतरणी...

## नारायण धारप

पार्टी म्हणून पाहायला गेलं तर त्या संध्याकाळचा पार बोऱ्याच उडाला असं म्हणायला हवं. म्हणजे सुरुवातीपासून नाही. आम्ही सर्वजण सहाच्या सुमाराला जमलो, गप्पागोष्टी झाल्या, थट्टामस्करी झाली. चहाचे एक-दोन हप्ते झाले. कोणी पान बनवलं, कोणी सिगरेट शिलगावली, कोणी तपकिरीची डबी काढली. एकंदरीत सर्वजण खुषीत होते. रात्रीचं जेवणही याच मूडमध्ये पार पडलं. जेवणानंतर काहींनी हॉलमध्ये ब्रिजचा डाव टाकला; तीन पत्तीही एका टेबलावर चालू होती. आणि या दोन्हीतही मजा नसणारे असे आम्ही पाच-सहाजण बाहेरच्या हिरवळी-वर बसलो होतो.

मंद सुगंधित वारा, निरभ्र आकाशात वर चढणारा चंद्र, कंपाऊंडशेजारूनच वाहणारी शांत शीतल नदी, रुचकर जेवण, मनासारखी कंपनी, पुढचे अनेक तास मोकळे. क्वचितच हे सारं जुळून येतं. पुढची सूचना अपेक्षितच होती.

" अण्णा, नदीला वळणाखाली बंड आहे ना हो ? "

" आहे ना. का ? बोटींगचा विचार आहे का काय ? "

" त्यासाठीच सारं जमून आलंय्, असं नाही वाटत ? "

" नाही ! " आवाज ठाम होता. आणि आश्चर्याची गोष्ट ही की हा नकार नाईक कडून आला होता. शंकर नाईक. कॉलेजच्या शेवटच्या वर्षी तो कॉलेज टीमचा कॉक्स होता. तिशीच्या आतला, रगेल, धाडसी नाईक !

त्यालाही ती आठवण आली असावी. त्याचा चेहरा जरासा शरमिंदा झाला. पण त्याने आपला नकार मागे घेतला नाही.



" दिवसा म्हणाला असतात तर मी सर्वांच्या आधी तयार झालो असतो. पण रात्री ! चांदण्या रात्री ? नो ! "

" वेल्, वेल् ! मला वाटलं होतं की– "

पण अण्णांनी ही छेड मध्येच थांबवली.

" शंकर, " ते नेहमीपेक्षा गंभीर आवाजात म्हणाले, " यमागे काहीतरी आहे. एखादा प्रसंग, एखादी आठवण–अं ? "

" आहे ना ! "

" मग सांग ना. "

" मला खरं ते आवडत नाही–पण सांगतो. "

सहज माझी नजर त्या चित्रावरून फिरली आणि मला दरदरून घाम फुटला.

" मी हे सहसा कोणाला सांगत नाही," शंकर म्हणाला, " कारण एकतर इतर कोणाचा या गोष्टीवर विश्वास बसणार नाही; आणि दुसरं म्हणजे मी स्वत: अस्वस्थ होतो. आपण फार फार गाफिल राहत असतो, याची जाणीव होते. आपण प्रकाशाकडे तोंड करून बसतो. अंधाराकडे पाठ करून बसतो. वास्तविक तिकडेच पाहायला हवं. तिकडेच काही काही–अं–चमत्कारिक गोष्टी आहेत."

" तुमच्यापैकी जे माझ्यावरोबर कॉलेजमध्ये होते, त्यांना माहीत आहे की माझे चुलते मलायात नोकरी करीत असत. ते भारताबाहेर इतकी वर्षं राहिले होते की त्यांना इकडचा ओढा असा नव्हताच. आणि शेवटीही ते आजारी पडले नसते तर इकडे परत आलेही नसते. पण डॉक्टरी सल्ल्यावरून ते इकडे आले आणि माझ्या वडिलांकडे राहू लागले. त्यांच्याजवळ अमाप पैसा होता आणि आम्हीच त्यांचे एकुलते

एक व सर्वांत जवळचे नातेवाईक होतो. तेव्हा वडिलांनी त्यांच्या लहानसहान इच्छेलाही मान दिला तर त्यात नवल नव्हते.

आमच्याकडे आल्यावर वर्षभरातच त्यांनी शेजारचा प्लॉट खरेदी केला आणि त्यावर स्वत:साठी लहानशी बंगली बांधली. त्याचे डिझाइन, रंगकाम हा त्या वेळी मोठा चर्चेचा विषय झाला होता. चारी बाजूंना चार-चार किंवा सहा-सहा ब्लॉकचे मॉडर्न बंगले होते. त्यांच्यांतही नवे नवे प्रकार होते, नाही असं नाही—वॉटरफॉल, कंटीलीव्हर, हे आणि इतर—पण काकांची बंगली वेगळीच होती—एक्सोटिक् ! हाच एक शब्द डोळयांपुढे येतो.

काका माझ्यावर बरीच माया करीत. कारण हे असलं पाहिजे की मला त्यांच्यांत फारसं कुतूहल नव्हतं. त्यांची ती संपूर्ण पाश्चात्त्य राहणी, पैशाचा अभिमान, कोणत्याही गोष्टीबद्दलचा दुराग्रह हे मला फारसं आवडायचं नाही. तेव्हा मी अगदी स्वतंत्र होतो आणि म्हणून त्यांच्या हिशेबी मला काहीतरी किंमत होती.

त्यांच्या घरात मला संपूर्ण स्वातंत्र्य होतं. अशा उत्तम कलाकुसरीच्या वस्तू आणि चित्रं मी आजवर पाहिली नाहीत. काही वस्तू केवळ क्वचित दिसणाऱ्या म्हणूनच आकर्षक होत्या; पण काही काही खरोखरीच मौल्यवान होत्या. एका चिनीमातीच्या सहा इंची सांजराला त्यांनी एकसष्ट पौंड दिले होते ! हा एक आकडा योगायोगाने माझ्या ध्यानात राहिला आहे. इतरही वस्तू अशाच ( माझ्या मते ) अवास्तव किंमतीला खरीदल्या होत्या. पण त्यांना यात अभिमान होता, सुख होते, आणि शेवटी त्यांची पैन् पै त्यांनी कमावली होती—ती वाटेल तशी उधळण्याचा त्यांना पूर्ण हक्क होता !

जरा मोठा झाल्यावर माझ्या ध्यानात आले की काकांचे सगळेच सौदे काही राजीखुषीने झालेले नव्हते. माणसाला एखादा छंद लागला की मग तो त्यापायी कधीकधी माणुसकीचे, समाजाचे, साधेसाधे नियमसुद्धा विसरतो. तेव्हा काकांनी आपल्या पैशांच्या जोरावर आडवळणी मार्गाने अनेक चिजा विकत घेतल्या होत्या. (मी तर म्हणेन त्यांचा अपहार केला होता.) त्यांतल्या बऱ्याचशा ते कडीकुलुपात ठेवत असत. त्यांतल्या काहीकाहीच मला आता आठवतात. एक पाचूची अंगठी, एक काचेचे कमळ.

आणि एक चित्र. चित्राचं वर्णन जरा वेळाने करणार आहे. ते माझ्या दृष्टीस कसं पडलं ते आधी सांगतो. काकांना संधिवाताचा विकार होता व तो दिवसेंदिवस बळावत चालला होता. हाताने नाजुक हालचाली करणं त्यांना कठीण जाऊ लागलं होतं. तेव्हा त्यांची तिजोरी उघडण्याचं काम माझ्याकडे आलं. आणि एकदा त्यांनी मला ते चित्र काढायला सांगितलं. हातात घेऊन कितीतरी वेळ काका त्या चित्राकडे पाहत होते. आणि शेवटी एक मोठा उसासा सोडून त्यांनी ते मला दिलं. शंकर, हे चित्र नीट पाहा. मग ते आत ठेव. मग त्याची हकीकत सांगतो. ते म्हणाले,

चित्र खूप जड होतं. फ्रेम व काच दोन्ही जाड होती. मला वाटतं मेझोटिंट प्रकारचं ते असावं. एक नदी, त्यावर एक नाव. नावेत दोघं नावाडी. नावेचं तोंड प्रेक्षकांकडे होतं. प्रत्यक्ष चित्रात चंद्र नव्हता, पण चंद्र प्रकाशाची कल्पना सहज येत होती. नदीच्या दोन्ही तीरांवर कसलेसे गवत आणि खूप मागे एक टेकडी. हे झालं चित्राचं वर्णन. पण त्याचा परिणाम कसा सांगायचा ?

इतका भकास, निराश देखावा मी कधी पाहिला नाही ! निराशेने जीव होरपळून टाकण्याचं सामर्थ्य त्या चित्रात होतं. चित्रकाराने काय तंत्र वापरलं होतं त्याचं त्याला माहीत ! पण ते चित्र जहरी होतं, भयानक होतं !

माझ्या चेहऱ्यावरचा बदल काका पाहत होते. 'अगदी तिटकारा येतो, नाही ?' ते म्हणाले. 'ठेवून दे ते चित्र आत. शंकर, ते मला कसं मिळालं ते सांगतो. कुवाला-लंपुरातल्या एका चिनी व्यापाऱ्याकडे ते मला दिसलं. त्या चित्राने प्रथमपासूनच माझ्या मनाची पकड घेतली. दलालामार्फत मी ते विकत घ्यायचा प्रयत्न केला, पण व्यर्थ ! शेवटी मी स्वतःच त्याला भेटलो आणि सरळ मागणी केली. त्याच्या घराण्यात आज कितीतरी शतकं ते चित्र होतं. मिंग डिनॅस्टीतलं असावं असा त्याचा अंदाज होता. पण विकायची बातसुद्धा ऐकायला तो तयार नव्हता. केवळ पैशांचा प्रश्न नव्हता. त्याच्या म्हणण्याप्रमाणे त्या चित्रात धोका होता. काय ते त्याने मला सांगितलं नाही. आणि माझा त्याच्यावर विश्वास बसला नाही. मी अशा गोष्टीवर कधीच विश्वास ठेवत नाही. शेवटी मी ते चित्र हस्तगत केलं आणि एका सुरक्षित जागी लपवून ठेवलं. मी जास्त खोलात शिरत नाही. चिन्याला अर्थात माझा संशय आला पण पुरावा काहीच नव्हता. पुढे माझ्या बंगल्यावर एकदोनदा चोरीही झाली. काही फारसं चोरीला गेलं नाही. पण चिन्याची गाठ पडल्यावर मी त्याच्याकडे पाहून हसलो. आणि तो मला म्हणाला, 'माझे शब्द विसरू नका. त्यात धोका आहे.' आणि मी त्यावर परत एकदा हसलो.'

मी चित्र तिजोरीत ठेवून दिलं. माझं मन अस्वस्थ झालं होतं एवढं खरं. काकांनी त्यानंतर अनेक वेळा ते चित्र माझ्याकरवी सेफमधून काढून पाहिलं. पुढे पुढे त्यांना चित्र हातातही धरता येईना. दर वेळी मला सांगायचा त्यांनाही कंटाळा आला. आणि शेवटी एके दिवशी त्यांनी मला ते चित्र त्यांच्या कॉटशेजारच्या टेबलावर मांडून ठेवायला सांगितलं. नुसती मान वळवून त्यांना ते चित्र पाहता येत होतं.

शंकर जरा वेळ गप्प बसला. भोवती शांत रात्र पसरली होती. लांबवरून नदीचा खळखळाट कानांवर येत होता.

तीन दिवसांनी काका नाहीसे झाले. रात्री डॉक्टर त्यांना भेटून गेले होते. मी संध्याकाळी भेटलो होतो. त्यांच्या प्रकृतीत आकस्मिक फरक पडला नव्हता. ते अगदी नेहमीसारखेच बोलले–चालले होते. आणि याशिवाय एक फार फार महत्त्वाची

गोष्ट होती. त्यांचे गुडघे इतके धरले होते की, काठीच्या साहाय्यानेसुद्धा ते जेमतेम बाथरूमपर्यंत जाऊ शकत होते. अगदी कसंबसं, धापा टाकीत. आणि ती त्यांची काठीसुद्धा कॉटला टेकून उभी होती. तेव्हा हा प्रकार होता तरी काय ?

डॉक्टरच्याच सल्ल्यावरून शेवटी आम्ही पोलिसात वर्दी दिली. आधी कॉन्स्टेबलं, मग सब-इन्स्पेक्टर व शेवटी इन्स्पेक्टर अशा चढत्या श्रेणींनी अधिकारी झाले. कारण काकांची तेवढी प्रसिद्धी खास होती. वर्तमानपत्रांतली प्रसिद्धी आम्ही आटोकाट प्रयत्न करून कशीतरी थांबवली. फक्त आतल्या पानावर 'हरवल्याचा शोध' या मथळ्याखाली एक फोटो व बक्षिसाची जाहिरात दिली. जास्त गाजावाजा होऊ दिला नाही. प्रकरण घरातल्या घरातच राहिलं.

पण किती काटेरी आणि रहस्यमय ! काका कोठे आणि कसे गेले ? दोन्ही प्रश्न महत्त्वाचे होते. आमच्याशिवाय त्यांना इतर नातेवाईकच नव्हते. त्यांचे जवळपासचे स्नेहीही इथे नव्हते. आणि कोठे जायचं म्हटलं तरी ते त्यांना, निदान एकट्यांना, शक्य नव्हतं. तेव्हा आणखी कोणीतरी व्यक्ती या प्रसंगात गुंतली होती की काय ? इन्स्पेक्टरांचा डोळ्यांत उमटलेली शंका व संशय आम्हांला पुरेपूर समजला. प्रकरण कदाचित् याहीपुढे गेलं असतं, पण काकांच्या वकिलांनी पोलिसांकडे काकांचं मृत्युपत्र दाखल केलं आणि आम्ही एकदम मोकळे झालो. आम्हांला त्यांनी दहा हजार रुपयांव्यतिरिक्त काहीही दिलं नव्हतं; आणि दहा हजार रुपये ही किंमत देऊन घेण्याइतकी आमची परिस्थिती खासच वाईट नव्हती. तेव्हा तो प्रश्न कायमचा मिटला.

पण मग काकांचं काय झालं ? इन्स्पेक्टरांनी खोलीची कसून तपासणी केली. बिछान्यावरची चादर जरा अस्ताव्यस्त झाली होती—पण काकांना झोपेत किंवा झोप आली नाही तर वळवळ करायची सवयच होती तेव्हा त्याला महत्त्व नव्हते. खोलीत दुसरं कोणी आल्याच्या किंवा काही हिसकाहिसकी झाल्याच्या काहीही खुणा नव्हता. रात्री कोणाला काहीही आवाज, भांडण, आरडाओरडा, किंकाळ्या, गाडीचा आवाज वगैरे काहीही ऐकू आलं नव्हतं. गेल्या काही दिवसांत आमच्या वस्तीत कोणी परकीय, संशयास्पद व्यक्ती फिरत असल्याचीही काही बातमी नव्हती. काकांच्या मेलमध्ये काहीही विशेष पत्रव्यवहार झाला नव्हता. एवढ्यात त्यांनी बँकेतूनही एखादी मोठी रक्कम काढली नव्हती. तेव्हा चोरी, ब्लॅकमेल, धाकदपटशा, सूड इत्यादी कोणतंही कारण दाखवता येत नव्हतं. त्याच्या वयोमानाप्रमाणे प्रकृती उत्तम होती. एखादा असाध्य रोग झाला नव्हता किंवा विकार बळावला नव्हता. तेव्हा एकदम निराश होऊन असा काही अविचार करण्याचंही त्यांना काही कारण नव्हतं. पोलीस सर्व शक्यतांचा विचार करीत होते—वेड, अपघात, पळवणे, आत्महत्या, खून...सर्व काही

"पण सर्व निष्फळ ठरलं. सर्व मोठमोठ्या व सरकारी हॉस्पिटल्समधून आम्ही

चौकशी केली. वर्तमानपत्रांतली जाहिरात बरेच दिवस चालू ठेवली, पण काका गेले ते कायमचेच !"

शंकर जरा वेळ गप्प बसला आणि मग हलकेच म्हणाला,

"ही गोष्ट एवढ्यावरच थांबली असती तर मी देवाचे फार फार आभार मानले असते. पण असं व्हायचं नव्हतं. या प्रकरणातला एक महत्त्वाचा, निर्णायक आणि भयानक दुवा मला दिसायचा होता. पुण्यावरच्या, सद्वर्तनावरच्या माझ्या विश्वासाला तडा जायचा होता. मनात एक असुरक्षिततेची जाणीव कायम ठाण मांडून बसायची होती."

शंकरने घसा साफ केला.

"वुईलचं प्रोबेट वगैरे व्हायला तीन महिने लागले. काकांनी एका शैक्षणिक संस्थेच्या नावाने प्रॉपर्टी करून दिली होती. ते लोक सज्जन होते, पण आमच्या भावनांसाठी ते किती थांबणार ? प्रॉपर्टीचा त्यांनी ताबा घेतला. काका बरेच दिवस आमच्या घरी राहिले होते. शेवटपर्यंत आमचे जाणे-येणे चालूच होते. आमच्या अनेक वस्तू त्यांच्या घरात राहून गेल्या होत्या. तेव्हा साहजिकच आम्हांला त्या घरी बोलावणं आलं आणि मी गेलो. घर दोन अडीच—महिने बंद होतं. तेव्हा जरासा कुंद वास, धूर, हे आलंच. पण तरीही हा बाहेरचा भाग झाला. शिवाय मनालाच अतिशय विषण्णता आली होती. तेव्हा काम शक्य तितक्या लवकर उरकण्याच्या मागे मी होतो.

"एक एक खोली उरकत उरकत शेवटी आम्ही काकांच्या बेडरूममध्ये पोचलो. कोणीतरी माझ्या हाती ते चित्र दिले. "हे आमचं नाही" असं म्हणून मी ते जवळ जवळ परत दिलं— आणि आता वाटतं, परत दिलं असतं तर किती बरं झालं असतं ! सहज कुतूहलाने माझी नजर त्या चित्रावरून फिरली. ती नदी, तो भकास देखावा, तो चंद्रप्रकाश, ती नाव, आणि ते नावाडी ....

"आठवण अडखळली. मी बारकाईने चित्राकडे पाहायला लागलो आणि खरंच सांगतो, भर दिवसा, चार-चौघांनी गजबजलेल्या त्या खोलीत मला दरदरून घाम फुटला. हातपाय लटलट कापायला लागले. आधारासाठी मी एका खुर्चीवर बसलो."

शंकरचा चेहरा आताही कावरा बावरा झाला होता.

"आधी तुम्हांला नीट सांगायला हवं. चूक होण्याची काहीही शक्यता नव्हती. अशा चुका सहसा होत नाहीत. मी मघाशी चित्राचं वर्णन केलं आहे. नाव प्रेक्षकांकडे येत होती. दोन्ही नावाड्यांच्या आपल्याकडे पाठी फिरलेल्या होत्या. त्यांच्या डोक्यांवर खूप मोठ्या अशा गवती हॅटस् होत्या. त्यांतील क्राऊन, रिम, सारे बारकावे अत्यंत कौशल्याने दाखवलेले मला आठवत होते. तेव्हा माझी चूक होत नव्हती.

"आता चित्रात बदल झाला होता. नाव आपल्यापासून दूर चालली होती.

नावाड्यांची तोंडं आपल्याकडे होती. वल्ह्यांवरचे हात जोर देण्यासाठी खाली केलेल्या माना, हॅटच्या रुंद रिमची चेहऱ्यावर पडलेली काळी सावली ... पण एवढ्याने होत नाही. ऐका. आता नावेत एक उतारू होता. तो या दोघांमध्ये बसला होता. निराशेने त्याची मान खाली केली होती. पण ती बसण्याची लकब, आणि ते कपडे .... काका ! माझे काका ! ते त्या चित्रात होते !

"मी मोठ्याने ओरडणार होतो–आणि शेवटच्या क्षणी मी स्वत:ला आवरलं. माझ्यावर कोणाचा विश्वास बसेल ? ही गोष्ट विश्वास बसण्यासारखीच नव्हती ! माझे शब्द ओठांवरच राहिले...

"आणि नजर त्या भयानक देखाव्यावर खिळून राहिली. हाच तो चित्रातला धोका होता. ही चित्रातली नदी साधी नव्हती. ती विवस्वती असेल, स्टिक्स असेल. माणसाला या जगातून खेचून काढून दुसरीकडेच कोठेतरी घेऊन जाणारी होती– आणि हे नावाडी ? हे कोण होते ? रूप मानवी होते, पण खरे कोण होते ? शेखचे साथी ? यमदूत ? का आणखीच कोणी ? आणि हा प्रवास कितवा होता ? या अभागी प्राण्याला ते कोठे सोडणार होते ? कारण हे पूर्वी झालं असलं पाहिजे–याला ते कोठेतरी सोडतील–पण नाव वळेल आणि ते परत आपल्याकडे येतील–

"ते साधं चित्रं होईल. या हातातून त्या हातात अशी त्याची अदलाबदल होईल, विक्री म्हणून, भेट म्हणून, चोरीनेसुद्धा आणि मग एखाद्या काळरात्री कोण्यातरी अभागी प्राण्याच्या खोलीत हे भयानक नावाडी उतरतील आणि त्याला घेऊन जातील—

"मी काही वेळ अगदी वेड्यासारखा झालो होतो. एकदा वाटलं हे चित्रं जमिनीवर आपटावं आणि त्याचे तुकडेतुकडे करून टाकावेत. हा सापळा कायमचा मोडून टाकावा पण ते तरी कसं होईल ? चित्रात माझे काका होते–ते कोणत्या अवस्थेत होते ? जिवंत होते का, मृत होते का ... खरंच विचारच सुचेना–

"चित्र शेवटी तिथेच ठेवलं आणि डोकं दोन्ही हातांनी गच्च धरून त्या खोली-तून पळत सुटलो. पुन्हा त्या घरात मी पाय टाकला नाही. त्या चित्रावर नजर टाकायचीही मला भीती वाटते. त्यात दोनच आकृती दिसतील या भीतीने मनाचा थरकाप होतो—"


शंकर चेहऱ्यावरचा घाम पुसत होता.

"तेव्हा माफ करा. तुम्ही सर्व अवश्य नौकाविहाराला जा. पण मला बोलावू नका. चांदण्यात नाव पाहिली की जिवाचा थरकाप व्हायला लागतो. आयुष्याची सुरक्षितता किती भ्रामक आहे, याची नव्याने जाणीव होते. आयुष्याची ही दारं– आपल्याला त्यांची कल्पनाही नाही. आणि नाही तेच बरं आहे !"

● ● ●




अन् याला उपाय ?
निश्चित आहे.
पंजाब नॅशनल बँकेचे
**सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्**



आपले दागदागिने, बॉण्डस्, महत्त्वाची कागदपत्रे आणि इतर मौल्यवान वस्तू सुरक्षित राहण्यासाठीं पंजाब नॅशनल बँकेच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्यें ठेवा. त्यामुळें चोरी आग, वाळवी इत्यादीपासून त्यांचे संरक्षण तर होतेच आणि आपणहि चिंतामुक्त होता.

**पंजाब नॅशनल बँक**

स्वावलंबनाचा एकमेव मार्ग — उत्पादनवृद्धि

PR/PNB/6620/Mr/3

# आनंद हवा असेल तर नाम घ्यावे

शरीरस्वास्थ्याला लागणाऱ्या शरीरातील द्रव्यात जेव्हा कमी अधिकपणा उत्पन्न होतो, तेव्हा शरीरस्वास्थ्य बिघडते. त्यालाच आजार म्हणतात. सुंठ हे असे औषध आहे की, ते शरीरात कमी झालेल्या द्रव्याची भरपाई करते व जास्त झालेले द्रव्य कमी करून शरीरस्वास्थ्य उत्पन्न करते व आरोग्य राखते. नाम हे सुंठेसारखे आहे.

आपल्या समाजात नंदादीप लावण्याची पद्धत आहे. नंदादीप हा तेलाचा दिवा असून त्याचे वैशिष्टय म्हणजे तो अखंड तेवत ठेवायचा असतो; त्याकरता त्यात तेलाचा सारखा पुरवठा करावा लागतो. त्याच रीतीने ज्याला आनंदरूपी नंदादीप हवा असेल त्याने सतत नामरूपी तेलाचा पुरवठा करीत राहिले पाहिजे. थोडक्यात म्हणजे ज्याला आनंद हवा त्याने सतत नाम घेतले पाहिजे. आनंदाचा उगमच नामात आहे. केव्हाही व कोठेही पाहिले तरी बर्फामध्ये थंडपणा हा असायचाच; त्याचप्रमाणे परमात्म्याजवळ नेहमी आनंद हा असायचाच असे समजावे. आपण जगामध्ये व्याप वाढवतो तो आनंदासाठीच वाढवितो; पण भगवंताव्यतिरिक्त असणारा आनंद हा कारणावर अवलंबून असल्याने ती कारणे नाहीशी झाली की, तो आनंद पण मावळतो म्हणून तो आनंद अशाश्वत होय.

'खावे, प्यावे आणि मजा करावी' हे तत्त्वज्ञान मला थोडेसे पटते, पण त्यामध्ये मोठा दोष असा, की हे देहबुद्धीवर आधारलेले असल्याने ते कायमचे म्हणजे टिकणारे नाही; कारण, आजची चांगली परिस्थिती उद्या बिघडली की, त्याची मजा गेली. उलट येईल त्या परिस्थितीमध्ये आपण आनंद निर्माण करावा. रोज अगदी पाचच मिनिटे भगवंताशी अनन्य व्हायला शिका. अशा त्या पाचच मिनिटांचा आनंद शंभर वर्षे नुसते जगून मिळणार नाही. साखरेच्या गोडपणाबद्दल तासन् तास निरूपणे करण्यापेक्षा एक चिमूटभर साखर तोंडात टाकली असता, जसा खरा आनंद मिळतो, तसेच येथे आहे.

जगण्यामध्ये आनंद आहे, ही गोष्ट खरी. ज्याच्याजवळ भगवंत आहे, त्यालाच आनंदाचे जिणे प्राप्त होईल, म्हणून ज्याला जगायचे आहे, त्याने नाम घ्यावे. ज्याचा आनंद नामात टिकेल, त्याला नित्य दिवाळीच आहे.

# नाम हीच सत्संगत

ज्या स्थितीत परमात्मा आपणांस ठेवतो, त्यात आनंद मानावा. प्रपंचातील दु:खांबद्दल वाईट वाटून घेऊ नये. आपण जगात वागताना "सर्व काही माझे" म्हणतो, पण, प्रत्यक्ष आपल्या वाटचास किती येते, याचा विचार आपण कधी करतो का? मिळण्याची व मिळविण्याची हाव वाढल्यामुळे आपल्याला खरे दु:ख होते. ही हाव नाहीशी होण्यास भगवंताच्या स्मरणात राहणे हा एकच उपाय आहे. भगवंताकडे चित्त गुंतवून ठेवणे हाच खरा धर्म मानावा. जगाला फसवू नये व जगाकडून फसले जाऊ नये. मी भगवंताचा आहे, ही जाणीव ठेवून वागावे. साहेब कोठेतरी दूर असतो व तुमची बदली तो कागदाच्या तुकड्यानेही करू शकतो. त्यास प्रत्यक्ष यावे लागत नाही. त्याचप्रमाणे मी सांगतो तसे वागणे यातच माझी संगत आहे. नामात जो राहिला तो सत्संगतीत राहिला. व्यवसाय व हौस याप्रमाणे आपण संगत धरतो. मनाची व नामाची संगत सोडून द्यावी. मालकाच्या बरोबर असलेला कुत्रा ज्याप्रमाणे धीट होऊन दुसऱ्यावर भुंकतो, त्याप्रमाणे आपण भगवंताच्या आधाराने राहावे. भुंकू मात्र नये. नेहमी लीनता ठेवावी. "मी साधन करतो" हे विसरून जावे. त्याबद्दल अभिमान धरणे म्हणजे साधनाला कमीपणाच आणणे होय. कामात लक्ष ठेवून सर्वांशी प्रेमाने वागावे, बायको दिराचा किंवा सासू-सासऱ्याचा मान ठेवते ती नवऱ्याला खुष करण्याकरिता. त्याप्रमाणे भगवंताला ज्या रीतीने समाधान होईल, त्याप्रमाणे आपण वागावे. याकरिताच संतांची संगत धरून ते सांगतील तसे वागावे. ते वागतील तसे वागू नये. डॉक्टरला जर आपण त्या काळच्या बाटलीतले औषध का मला देत नाही, असे म्हटले तर तो ज्याप्रमाणे "तुला तो रोग नाही" असे उत्तर देतो, त्याचप्रमाणे वृत्ती ओळखून संत मार्ग सांगतात. आपल्या पतंगाची दोरी आपण संतांच्या हातात द्यावी व आपण खुशाल निश्चित राहावे.

आपण फक्त संत आपल्याला सांगतील, त्याप्रमाणे वागावे; त्यात आपलेच घुसडू नये. आपले काम खात्रीने झालेच पाहिजे. पाणी गोठून जसे बर्फ बनते, बर्फाच्या आतबाहेर पाणी असते तसे जो आतबाहेर भगवंताच्या प्रेमाने ओथंबलेला असतो, त्याला संत म्हणतात. असे संत फक्त नामस्मरणानेच जोडता येतात.

# आणि ड्रॅगन जागा झाला

लेखांक सातवा

**अरुण साधू**




हुनान प्रांतात क्रांतीचे प्रचंड वादळ उसळले होते. शतकानुशतकांचा कोडगेपणा, भीती, जुन्या परंपरा आदी बेड्या हुनानी शेतकऱ्यांनी झुगारून दिल्या होत्या. नव्या ईर्ष्येने ते पेटून उठले होते आणि त्यांच्या क्रोधाग्नीत हुनानी जमीनदारांची सत्ता, ऐश्वर्य, दंभ आणि अहंकार सारे जळून बेचिराख होत होते. आपल्या संघटित शक्तीचा साक्षात्कार प्रथमच या शेतकऱ्यांना होत होता.

१९२७ च्या सुरुवातीला आपल्या पक्षातर्फे या हुनानी शेतकऱ्यांच्या उठावाची पाहणी करण्यासाठी म्हणून माओ हुनानमध्ये आला खरा, पण तेथे त्याने जे पाहिले ते त्याच्या अपेक्षेबाहेरचे होते. त्याने तो स्वतःच आश्चर्यचकित झाला.

माओने शेतकऱ्यांच्या प्रश्नाचा कसून अभ्यास केला होता. तो त्याचा खास विषय होता. वर्षापूर्वीच तो कोमिन्टांग शेतकरी समितीचा चिटणीस होता. त्या काळात त्याला मिळालेल्या आकडेवारीवरून त्याला असे दिसून आले होते की, एकूण लोकसंख्येच्या ६५ टक्के प्रमाण असलेल्या गरीब शेतकऱ्यांच्या ताब्यात देशातील फक्त १० ते १५ टक्के शेतजमिनी होत्या. उरलेल्यांपैकी १५ टक्के मध्यमवर्गीय शेतकऱ्यांकडे आणि इतर ७० टक्के शेतजमिनी श्रीमंत जमीनदार-सावकारांच्या मालकीच्या होत्या.

या आकडेवारीवरून माओने निष्कर्ष काढला की, शेतकऱ्यांची मनोभूमी आता बंडाला निश्चितच सुपीक झाली आहे. त्यांना फक्त योग्य संघटना देण्याचाच अवकाश. एक वर्षभरापूर्वी त्याने हुनानमध्ये शेतकरी संघटना स्थापन करावयास सुरुवात केली होतीच. त्यामुळे या उठावाची पाहणी करण्यासाठी जेव्हा माओ आला,



तेव्हा तेथे शेतकऱ्यांच्या क्रांतिकारक संघटना व चळवळी मोठ्या प्रमाणावर चालू असतील, एवढीच त्याची अपेक्षा होती.

### शेतकऱ्यांचा स्वयंस्फूर्त उठाव

परंतु अपेक्षितपणे त्याला तेथे वेगळेच दृश्य दिसले. हुनानमध्ये क्रांतीचा भडका उडाला होता. वर्षभरापूर्वी हुनानी शेतकऱ्यांची स्थिती बघून त्याला दुःख होत होते. त्यांना संघटना, नेतृत्व कसे देता येईल याची चिंता त्याला लागून राहिली होती, आज मात्र त्याला त्याचाच अभिमान वाटू लागला होता. कुणाच्या मार्गदर्शनाची वाट न पाहता हुनानी शेतकऱ्यांनी स्वयंस्फूर्त क्रांती घडवून आणून साऱ्या देशात क्रांती कशी यशस्वी होऊ शकेल, याची दिशाच दाखवून दिली होती. पाहणीनंतर लिहिलेल्या अहवालामध्ये माओने मोठ्या अभिमानाने म्हटले, " डॉ. सन् यत सेनला ४० वर्षे अहर्निश प्रयत्न करूनही जी क्रांती साध्य करता आली नाही, ती याच हुनानी शेतकऱ्यांनी काही महिन्यांच्या अवधीतच साध्य केली आहे."

कोमिन्टांग सरकार आणि उत्तरेच्या मोहिमेचे क्रांतिकारक सैन्य क्रांतीच्या नुसत्या घोषणा करीत होते. पण खरी ' क्रांति ' काही होत नव्हती, शेतकऱ्यांच्या स्थितीत काही बदल होत नव्हता; त्यामुळे शेतकऱ्यांचा असंतोष धुमसू लागला होता. हुनानी शेतकरी जात्याच बंडखोर. त्यांनी स्वतःच क्रांती घडवून आणण्याचे ठरविले. वर्षभरापूर्वी माओने संघटित केलेल्या शेतकरी संघटना अस्तित्वात होत्याच.

चांगशाजवळील एका खेड्यातील शेतकऱ्यांनी एकाएकी मोठा जमाव करून स्थानिक जमीनदारांच्या घरांवर हल्ला केला. त्यांच्या घरांतील चैनीच्या वस्तू बाहेर

काढून त्यांची होळी पेटविण्यात आली. आतील सारी संपत्ती शेतकऱ्यांच्या संघटनेसाठी जप्त केली. त्यांच्या जमिनीचे कागदपत्र फाडून जाळून टाकले. नंतर त्यांना उंचावर उभे करून त्याच्याकडून त्यांच्या गुन्ह्याचा, जुलमी कृत्यांचा साऱ्या जमावासमोर कबुलीजबाब घेतला आणि मग गाढवावरून त्यांची धिंड काढण्यात आली.

## दहशतीचे वातावरण

शेतकऱ्यांच्या हातात त्या खेड्याची संपूर्ण सत्ता आली होती. झाले, ठिणगी पडली. ही वार्ता कळताच हुनानमधल्या शेतकऱ्यांनी एकदम सर्वत्र अशा तऱ्हेच्या उठावाला सुरुवात केली. शेतकरी संघटनांनी या कामी पुढाकार घेतला. जुलै ते सप्टेंबर १९२६ च्या दरम्यान या संघटनांची सदस्यसंख्या ३ ते ४ लाखांच्या आसपास होती, पण ऑक्टोबरनंतर ती एकदम २० लाखांवर गेली. या सदस्यांनी साऱ्या शेतकऱ्यांना संघटित करून भराभर ठिकठिकाणी सत्ता हाती घेण्यास सुरुवात केली.

क्रांतीची ज्वाला प्रज्वलित झाली. जमीनदारांच्या जीवितास धोका निर्माण झाला. श्रीमंतांनी जमेल तेवढे गाठोड्यांत बांधून शांघाय, हँकोव, चांगशा अशा सुरक्षित स्थळी पळ काढण्यास सुरुवात केली. जे जे जमीनदार शेतकऱ्यांनी पकडले, त्यांना त्यांना आपल्या हाताने शेतकऱ्यांना जमिनी वाटून द्याव्या लागल्या. श्रीमंत सावकारांना आपले पैसे शेतकरी फंडांना द्यावे लागले. अनेक जमीनदारांच्या धिंडी काढण्यात आल्या.

ज्या जमीनदारांनी पूर्वी शेतकऱ्यांचा छळ केला होता, त्यांना ठार मारण्यात आले. जे माफी मागत व आपणहून जमिनी वाटून देत ते सुटत. प्रचंड वादळ उसळले होते. त्या वादळापुढे नमतील तेच बचावत होते. इतर उन्मळून पडत होते.

शेतकऱ्यांचा मुख्य रोख स्थानिक गुंडांवर, दुष्ट जमीनदारांवर, आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांवर होता. खेड्यांतील दुष्ट रूढींवरही त्यांचा आकस होता. एखाद्या झंझावाती वादळाच्या वेगाने व ताकदीने ते त्यांवर हल्ले चढवीत होते, त्यामुळे गेली हजारो वर्षे जमीनदारांनी जी सत्ता, सुखे, चैन व विलास उपभोगले होते, ते सारे या वादळाच्या तडाख्यात धुळीला मिळत होते. जमीनदारांची प्रतिष्ठा, त्यांचा दिमाख पार लयाला गेला होता व त्यांची हुकूमत नष्ट झाल्याने शेतकरी संघटनांचा एकमेव अधिकार हुनानी खेड्यांमध्ये चालत होता.

आपसातील सारी भांडणे आता या संघटनेमार्फत सोडविली जाऊ लागली. शेतकऱ्यांचा इतका पुरेपूर विश्वास या संघटनांनी संपादन केला होता की, नवराबायकोमधील क्षुल्लक भांडणदेखील संघटनांच्या प्रतिनिधींना सोडवावे लागे. संघटनेच्या हुकमाशिवाय ग्रामीण भागांत कुठलीही गोष्ट होऊ शकत नव्हती आणि संघटनेचा हुकूम तंतोतंत पाळला जात होता.

जे जे सुखवस्तू आणि गुंड या संघटनेला विरोध करीत, त्यांच्या त्यांच्या घरांत लोकांचे जमाव घुसत. घरांतील धान्य आणि जनावरे ते जप्त करीत. घरांतील मऊ मऊ गाद्यांवर ते लोळून बघत. कुणी थोडाही विरोध केला की लगेच त्याला अटक करीत. त्याच्या डोक्यावर उंच कागदी टोप्या घालून त्यावर त्याची पापे लिहीत व गावातून त्याची धिंड काढीत. " बघा, आम्ही शेतकरी काय आहोत ते, " असे त्यांना दाखवायचे होते. हे शेतकरी मनाला वाटेल तसे मुक्त वागत. त्यामुळे ग्रामीण भागांत थोडे दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.

आपल्या अहवालामध्ये माओ-त्से-तुंगने शेतकऱ्यांच्या या चळवळीचे जोरदार समर्थन केले.

## क्रांती आणि हिंसाचार

त्याने लिहिले, " काही लोक म्हणतात, हे फारच झाले. शेतकऱ्यांनी अतिरेक केला. जुन्या चुकांची दुरुस्ती करण्यासाठी एवढ्या मर्यादा ओलांडायला नकोत..."


परंतु या लोकांचे म्हणणे जरी वरवर पटत असले तरी ते मुळात चुकीचे आहे.

" एक म्हणजे या ज्या घटना घडत आहेत, त्या अपरिहार्य आहेत. स्थानिक गुंडांनी व दुष्ट जमीनदारांनी आजवर जी कुकर्मे केली, त्यांचाच हा परिपाक आहे. युगानुयुगे या लोकांनी कायद्याच्या जोरावर गरीब शेतकऱ्यांवर जुलूम जबरदस्ती करून त्यांना आपल्या पायांखाली तुडविले आहे. त्यामुळेच हे शेतकरी बंड करून उठले आहेत.

शिवाय क्रांती म्हणजे जेवणाच्या पंक्तीला बसण्यासारखी, चित्रे काढण्या-सारखी, कविता लिहिण्यासारखी किंवा कापडावर कलाकुसर काढण्यासारखी नाजुक गोष्ट नव्हे. क्रांती इतकी शांतपणे, थंडपणे, नाजुकपणे, मानपान ठेवून, उदार मनाने, हातचे राखून होतच नसते. क्रांती म्हणजे एका वर्गाने दुसऱ्या जुलमी वर्गाला सत्तेवरून खाली खेचण्यासाठी केलेला उठाव आहे; ते हिंसात्मक कृत्य आहे. जमीनदारांना शेतकऱ्यांनी सत्तेवरून उलथून टाकणे हीच खरी ग्रामीण क्रांती. जर शेतकऱ्यांनी आपल्या बळाचा वापर केला नाही तर हजारो वर्षे ज्यांच्या हाती सत्ता एकवटली आहे त्यांना ते खाली खेचूच शकणार नाहीत.

तेव्हा सरळ शब्दांत सांगायचे म्हणजे शेतकऱ्यांना काही काळ दहशतीचे वातावरण निर्माण करणे आवश्यक होते. त्याशिवाय ते प्रतिक्रांतिवाद्यांना आणि जमीनदारांना नमवूच शकले नसते. चुकांची दुरुस्ती करण्यासाठी मर्यादा सोडणे आवश्यक असते; नव्हे मर्यादांबाहेर गेल्याशिवाय चुकीची दुरुस्ती होऊच शकत नाही. "

आपल्या अहवालाच्या शेवटी माओने वुहान सरकारने ताबडतोब या बाबींकडे लक्ष द्यावे असे आवाहन केले. आपल्या 'चुका' सरकारने लौकर दुरुस्त कराव्यात


चीन
सोव्हिएट रशिया
बाह्य मंगोलिया
आंतर मंगोलिया
सिकियांग
काश्मीर
पश्चिम पाकिस्तान
दिल्ली
तिबेट
नेपाळ
भारत
पूर्व पाकिस्तान
कलकत्ता
ब्रम्हदेश
थायलँड
लाओस
व्हिएटनाम
हैनान
फोर्मोसा
फिलिपाइन्स
हाँग काँग
कँटॉन
पेकिंग
कोरिया
नानकिंग
शांघाय
वुहान
पीत नदी
यांगत्से नदी
चिंगकाशान

कारण थोड्याच अवधीत अवघ्या चीनमधील शेतकरी प्रचंड वादळाप्रमाणे उठाव करतील आणि मग जगातील कोणतीच शक्ती त्यांना आवरू शकणार नाही, असा इशारा त्याने दिला. " सारे साम्राज्यवादी, सारे लष्करी सरदार, भ्रष्ट अधिकारी व जमीनदार या शेतकऱ्यांच्या हस्ते नष्ट पावतील. आपण त्याचे नेतृत्व करावयाचे, त्यांच्या मागे नुसती टीका करायची की त्यांचे शत्रुत्व पत्करावयाचे ? या तिन्हीं-पैकी कुठलाही एक पर्याय चिनी जनतेला स्वीकारता येईल. "

### उठाव दडपला

परंतु चिनी कम्युनिस्ट पक्षाने माओ-त्से-तुंगचा अहवाल स्वीकारला तर नाहीच, उलट, पक्षाच्या पाचव्या अधिवेशनात शेतकऱ्यांच्या उठावात भाग घेतला म्हणून त्याच्यावर टीका झाली.

चीनमधील राजवटीची या वेळेस अनेक शकले झाली होती. साधारण उत्तरेकडील विभागात लष्करी सुभेदार व सरदार त्यांचे प्रांतीय सहकारी यांची मुलुखगिरी चालू होती. मध्य चीनमध्ये चँग-कै-शेकचे उजवे कोमिन्टाँग सरकार होते. आणि वुहानच्या आसपास डाव्या कोमिन्टांगची हुकमत होती. हुनान प्रांतही या तिघां-मध्ये विभागला गेला होता. त्यापैकी एकाहि राजवटीने जरी या वेळी शेतकऱ्यांना पाठिंबा दिला असता तरी इतिहास बदलला असता.

परंतु पहिले दोन पक्ष शेतकऱ्यांचे कट्टर वैरी होते. कम्युनिस्ट पक्ष किंवा डावा कोमिन्टांग पक्ष या शेतकऱ्यांकडे सहानुभूतीने बघेल, अशी माओ-त्से-तुंगला आशा वाटत होती. कम्युनिस्ट पक्षाने त्याचा अहवाल फेटाळल्यावर तो डाव्या कोमि-न्टांगच्या मध्यवर्ती समितीपुढे आला. याही समितीवर कम्युनिस्ट नेता चेन तु हूसियू होता. तेथे या अहवालावर चर्चाही करण्यास त्याने हरकत घेतली.

साऱ्याच राजवटींनी आपापल्या प्रदेशांत लष्कराच्या मदतीने क्रूरपणे उठाव दडप-ण्यास सुरुवात केली. हुनानमध्ये डाव्या कोमिन्टांगच्या एका लष्करी अधिकाऱ्याने अनेक शेतकऱ्यांना आणि कम्युनिस्टांना गोळ्या घालून ठार मारण्यास सुरुवात केली. त्यावर माओच्या काही कम्युनिस्ट शेतकरी अनुयायांनी सशस्त्र प्रतिकाराची तयारी आरंभली. पण मध्ये कोमिन्टार्न पडले. शेतकऱ्यांना सबुरीचा सल्ला दिला. आणि लष्कराने विश्वासघात करून शेतकऱ्यांना अक्षरशः कापून काढले. जुलै १९२७ पर्यंत लष्कराने शेतकऱ्यांचा हा उठाव दडपून टाकला.

हा उठाव अयशस्वी झाला खरा, पण माओला त्यापासून खूप गोष्टी शिकायला मिळाल्या. पहिली गोष्ट म्हणजे शेतकऱ्यांच्या सामर्थ्याचे पूर्ण प्रत्यंतर त्याला आले आणि खरी क्रांती चिनी शेतकरीच घडवून आणतील, असे त्याचे ठाम मत झाले. दुसरे म्हणजे या शेतकऱ्यांजवळ पुरेसी शस्त्रास्त्रे असती तर त्यांचा उठाव यशस्वी झाला असता याबद्दल त्याच्या मनात संदेह उरला नाही. तेव्हा क्रांती यशस्वी

करावयाची असेल तर शेतकऱ्यांना शस्त्रसज्ज करणे आवश्यक आहे, याची त्याने खूणगाठ बांधून ठेवली.

आणि मुख्य म्हणजे शेतकऱ्यांनी ज्या पद्धतीने आपल्या संख्याबळाचा वापर केला तीही कल्पना माओला अगदी नवीन वाटली. हुनानी शेतकऱ्यांनी ज्या तऱ्हेने आपली दहशत निर्माण केली, विरोधकांच्या मागे लागून ज्या तऱ्हेने त्यांची मने वळविली आणि जमीनदारांच्या तोंडून ज्या तऱ्हेने स्वतःचे गुन्हे जाहीरपणे वदवून घेऊन त्यांना जाहीर माफी मागायला लावली, त्या सर्व पद्धती माओने पुढे १९४९ नंतर जशाच्या तशा वापरल्या. उठावाची पाहणी करण्यासाठी तो अवघा महिनाभर हुनानमध्ये होता, पण तेवढ्या अवधीत त्याने खूपच पाहून घेतले.

हुनानी शेतकऱ्यांचा उठावही चीनच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाची घटना मानली जाते; परंतु त्याचबरोबर त्याबद्दल उपलब्ध असलेली माहितीही अगदीच त्रोटक आणि पक्षपाती आहे.

## ॲना लुई स्ट्राँग

हा उठाव दडपला जात असतानाच अना लुई स्ट्राँग या नावाची एक अमेरिकन पत्रकार स्त्री मुद्दाम हुनानच्या ग्रामीण विभागाचा दौरा करून आली. तिने दिलेली माहितीच त्यातल्या त्यात जरा अधिक वस्तुनिष्ठ आणि विश्वसनीय अशी आहे. तिने लिहिले आहे, "मला मिळालेली माहिती ती चळवळ दडपून टाकणारे लष्करी अधिकारी किंवा चळवळीकडे तिरस्काराने बघणारे मिशनरी यांच्या तोंडची. तरीही त्यांनी सांगितलेल्या कथांवरून हुनानी शेतकऱ्यांचे बंड ही एक महान, प्रचंड, शिस्तबद्ध चळवळ होती, असे माझे मत बनले."

हुनानच्या मिलिटरी गव्हर्नरच्या सरसेनापतीला "चळवळ दडपण्यात कितपत यश मिळाले आहे?" असे ॲनाने विचारता तो म्हणाला, "आम्ही गेले दोन महिने कम्युनिस्टांना हुडकून काढून प्रांताबाहेर तरी घालवतो आहोत किंवा ठार तरी करतो आहोत. सारी मोठी शहरे आता जवळ जवळ 'सुरक्षित' आहेत. कारण शहरांमधील कामगार संघटना दडपण्यासाठी चिकार सैनिक आहेत." परंतु त्या सेनापतीने ॲनाला ग्रामीण विभागांत जाऊ नका, असा सल्ला दिला. तो म्हणाला, "खेड्याखेड्यांतून आमचे सैनिक जाऊन कम्युनिस्टांना हुडकून काढीत आहेत खरे, पण सैनिकांचा मुक्काम हलला की शेतकऱ्यांच्या संघटना नव्या नावाने पुन्हा डोके वर काढतात. परंतु आता लवकरच उत्तरेकडून सैनिकांची कुमक येणार आहे. मगच आम्ही प्रत्येक खेड्यात सैनिक ठेवू शकू."

त्या सेनापतीने ग्रामीण विभागात जाऊ नकोस, असा ॲनाला सल्ला दिला तरी तिने आपला बेत बदलला नाही. ट्रकमधून, रिक्षांतून, पायी, असा प्रवास करीत ती चांगशापासून दक्षिणेस सुमारे शंभर मैलांवर असलेल्या युंगफाँग या छोट्याशा

ग्गवी पोचली. उठावाच्या काळात युंगफाँग हे गाव अतिशय तप्त झाले होते, असा लौकिक होता. बारा ते पंधरा हजार लोकवस्तीचे गाव एका मोठ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वसले होते. आजूबाजूच्या खेड्यांतील जमीन गावांतील फक्त दहा कुटुंबांच्या मालकीची होती आणि ती कुटुंबे आपली जमीन इतर शेतकऱ्यांकडून अर्ध्या पिकाचे भाडे घेऊन कसायला देत. त्यामुळे त्यांच्या घरची धान्याची कोठारे तांदळांनी गच्च भरलेली असत. गरीब शेतकऱ्यांजवळचा तांदूळ संपला आणि ते उपासमारीने या कोठारांच्या दाराशी मरू लागले की, मगच ते कोठारे उघडत आणि अव्वाच्या सव्वा दराने तांदूळ विकीत. चिनी शेतकरी इतके शांत आणि कोडगे होते की, ते हे सारे मुकाट्याने सहन करीत.

परंतु या वर्षी शेतकऱ्यांनी आपल्या संघटना स्थापन केल्या होत्या. युंगफाँगची संघटना आजूबाजूच्या वीस मैलांपर्यंत आपला अधिकार गाजवीत होती. हुनान पेटला, तेव्हा ही संघटनाही पेटून उठली.

## युंगफाँगची क्रांती आणि प्रतिक्रांती

परंतु युंगफाँगच्या या संघटनेने या क्षेत्रातील फक्त एकाच जमीनदाराला ठार केले, असे युंगफाँगच्या चर्चमधील जर्मन मिशनरी पास्टर शिडे वुल्फ याने ॲनाला सांगितले. ॲनाने खोदून खोदून विचारले, तेव्हा शिडे वुल्फने कबूल केले की तो जमीनदार अतिशय वाईट शीलाचा आणि जुलमी व भ्रष्टाचारी होता.

युंगफाँगच्या शेतकरी संघटनेला, पकडलेल्या आरोपींना मृत्युची शिक्षा देण्याचा अधिकार नव्हता. अशा केसेस सियांग सियांग या जिल्ह्याच्या ठिकाणच्या संघटने-कडे पाठविण्यात येत. चळवळीच्या अगदी सुरुवातीपासून ही शिस्त संघटनांनी पाळली.

परंतु श्रीमंत शेतकऱ्यांना पकडून त्यांच्याकडून पैसे व तांदूळ दंड म्हणून घेण्याचा अधिकार युंगफाँग संघटनेला होता. चर्चच्या शेजारीच असलेल्या एका कोठारात हा जप्त तांदूळ साठवला होता आणि संघटनेचे पुढारी हा तांदूळ अतिशय स्वस्त दराने गरिबांना विकीत. प्रत्येकालाच हा तांदूळ विकत घेता येत नसे. श्रीमंतांना खाजगी शेतकऱ्यांकडून अधिक भावाने तांदूळ खरीदावा लागे. पास्टर शिडे वुल्फच्या दोन्ही नोकरांना या कोठारातून तांदूळ मिळत होता. पण शिडे वुल्फ जेव्हा तांदूळ मागायला गेला, तेव्हा त्याला सांगण्यात आले, तू श्रीमंत आहेस तर दुसरी-कडून विकत घेऊ शकतोस. तांदूळ विकून मिळणारे पैसे आणि इतर पैसे मुलांच्या शिक्षणासाठी संघटना वापरत होती.

त्याच सुमाराला चांगशाहून मध्यवर्ती संघटनांच्या सूचना आल्या की परकीय मिशनऱ्यांकडून त्यांच्या इमारती ताब्यात घ्याव्या. या हुकमावर शेतकऱ्यांत बराच वादविवाद झाला. हा वादविवाद चालू असतानाच काही श्रीमंत शेतकरी पास्टर

शिडे वुल्फला सावध करण्यासाठी गेले. तेवढ्यात चर्चच्या रोखाने गर्दी येऊ लागली मुली आणि मुले शिंगे, बिगुल वाजवीत होती, शेतकऱ्यांच्या हाती भाले होते आणि सैनिकांच्या हाती बंदुका होत्या.

संघटनेचा पुढारी कोण आहे, असे पास्टरने विचारताच, माध्यमिक शाळेचा मुख्याध्यापक, सैनिकांचा अधिकारी आणि तेथील टेलिग्राफ ऑफीसर एवढे पुढे आले. आत येऊन चर्चा करण्याची पास्टरने त्यांना विनंती करताच ते म्हणाले, " माफ करा. तुम्ही जर्मन असल्याने तुम्हांला काही धोका नाही. परंतु आता आमची कोमिन्टांग पार्टी धर्माच्या विरुद्ध आहे. युंगफाँगमधून तुम्ही निघून जावे असे आम्ही लोकांच्या वतीने तुम्हांला सांगतो. " पास्टर ख्रिश्चन धर्माचे महत्त्व वर्णन करून सांगू लागला. त्यावर ते म्हणाले, " पण आता आमच्याजवळ लोकशक्ती आहे. धर्माची गरज नाही. "

पास्टरने वॉरंट दाखवा म्हणून सांगितले. त्यावर ते म्हणाले, "वॉरंटची गरज नाही. हे लोकांचे राज्य आहे आणि आम्ही लोकच तुम्हांला 'जा' म्हणून सांगतो आहोत. "

चार आठवड्यांचा तरी अवधी मिळावा, अशी पास्टरने विनंती केली पण त्याला चार दिवसांचाच अवधी देण्यात आला. " तुम्ही तुमच्या वैयक्तिक वस्तू नेऊ शकता. परंतु मिशन हे लोकांना दिलेले असल्याने मिशनची मालमत्ता तुम्ही नेऊ शकणार नाही, " असे त्याला सांगण्यात आले. पास्टरने आपल्या सामानाची पावती मागितली. ती त्याला ताबडतोब मिळाली. चार दिवसांनी जेव्हा पास्टर गाव सोडून जाण्यास निघाला, तेव्हा सारे गाव, साऱ्या संघटनांसह त्याला निरोप देण्यासाठी लोटले होते. फटाक्यांची धमाल उडवून देण्यात आली. त्याने केलेल्या उत्तम कामगिरीबद्दल त्याचे आभार मानणारी भावपूर्ण भाषणे झाली.

काही आठवड्यांनंतर पास्टर शिडे वुल्फ युंगफाँगला परत आला. आपली मिशनची इमारत परत मिळविण्याविषयी त्याने चांगशा येथील शेतकरी संघटनांकडून हुकूम आणले होते. ते हुकूम आणि आपल्या पावत्या दाखवताच त्याला चार तासांच्या आत सारी मिशनची इमारत आतील सामानासह जशीच्या तशी परत मिळाली.

या काळात पास्टर शिडे वुल्फला आणि इतर कर्मठ चिन्यांना धक्का देणारी दुसरीच एक गोष्ट घडली. सुमारे दहा क्रांतिकारक मुली या काळात इतर क्रांतिकारकांबरोबर मिशनच्या इमारतीतच झोपत होत्या. "वाया गेलेल्या बाया" म्हणून कर्मठ चिनी त्या मुलींकडे बघत होते. पण आखूड केस कापून पुरुषी लष्करी पोशाख घालणाऱ्या त्या मुली घरोघरी जाऊन स्त्री-शिक्षणाचा, स्त्री-स्वातंत्र्याचा प्रचार करीत.

चळवळ दडपल्यानंतर त्या मुलींपैकी एका मुलीला पकडून विशेष शिक्षा देण्यात

आली. ' आपण स्त्रियांप्रमाणे दिसू नये म्हणून ती आपल्या छातीभोवती कातडी पट्टे गुंडाळून छाती दाबून ठेवते,' असा तिच्याबद्दल प्रवाद होता. बंड दडपले तेव्हा तेथील व्यापारी संघटनांनी तिला पकडून कमरेपर्यंतची तिची वस्त्रे फेडून तिला दोन दिवस-रात्र शिपायांच्या पहाऱ्यात मुख्य रस्त्यावर उभे केले. ' ती खरोखरच स्त्री आहे ' हे लोकांना दिसण्यासाठी हा उद्योग करण्यात आला होता.

## सियांग सियांगचा अनुभव

सियांग सियांग या जिल्ह्याच्या ठिकाणच्या मिशनऱ्यांचा अनुभवही असाच विचित्र आहे.

सोमवार, १८ एप्रिल १९२७ रोजी संध्याकाळी ते जेवत होते. तेवढ्यात त्यांची मोलकरीण धावत धावत येऊन सांगू लागली; ' शेतकरी-कामगारांचे सैन्य रस्त्या-वरून येत आहे. ' त्यांनी आपले खाणे तसेच चालू ठेवले.

तेवढ्यात त्यांच्या जेवणाच्या खोलीच्या खिडकीतून एका क्रांतिकारकाचे डोळे दिसले. त्याने जोरदार शिटी फुंकली त्याबरोबर काही लोक आत घुसले. काहींनी दारे अडवून धरली. पण कुणीही मिशनऱ्यांना स्पर्शही केला नाही.

एका मिशनऱ्याने ॲना स्ट्रॉंगला सांगितले, " लोकांच्या पुढाऱ्याला पाहताच आमची भीती पार पळाली. तेथील सरकारी शाळेचा तो मुख्याध्यापक नियेह हा होता आणि आमचा चांगला दोस्त होता. बोल्शेव्हिझमचे त्याचे वेड सोडले तर तो एक जबाबदार माणूस होता. "

तो म्हणाला, " आम्हांला परकीय धर्माची गरज नाही. तुम्ही येथून तीन दिव-सांत निघून जावे. "

आम्ही ओरडलो, " तुम्ही हे खरेच मनापासून सांगता आहात काय ? " " हो खरोखरच " तो ओरडला.

तो पुढे म्हणाला, " तुम्हांला शहरांत व्यापारी म्हणून राहायचे असेल तर दुसरी जागा भाड्याने घेऊन राहता येईल. पण ही इमारत तुम्हांला खाली करावीच लागेल. जायचे असेल तर तुम्हांला आपल्या वैयक्तिक वस्तू बरोबर नेता येतील. शिवाय तुमचे मिशन गरीब असल्याचे आम्हांला माहीत असल्याने तुम्हांला शांघाय-पर्यंतचा प्रवासखर्च म्हणून २०० डॉलर्स देण्याचा ठराव आम्ही मंजूर केला आहे. "

हे बोलणे चालू असतानाच एक इसम आपल्या दोन सहाय्यकांसह मिशनच्या प्रत्येक खोलीत जाऊन सामानाची तपशीलवार यादी करीत होता. इमारतीच्या खिडक्या आणि काचेची तावदाने यांचीही संख्या या यादीत होती. ज्या खोल्यां-मध्ये आमच्या वैयक्तिक वस्तू नव्हत्या त्यांना ताबडतोब कुलुपे लावून संघटनेची सिले ठोकण्यात आली.

आम्ही चार दिवसांनंतर हलण्याचे कबूल केल्यानंतर त्यांनी आमचे आभार

मानले आणि ती सारी मंडळी सभ्यपणे निघून गेली. जाताना मिशनच्या रक्षणासाठी १० सैनिक त्यांनी मागे ठेवले.

दुसरे दिवशी आम्ही आमची वैयक्तिक चीजवस्त बांधू लागलो, तेव्हा आजूबाजूला जमलेल्या गर्दीतील लोक हळूहळू एकेका सामानावर हात टाकू लागले. संघटनेचे सील ठोकलेल्या सामानाला हात लावण्याची त्यांची हिंमत नव्हती. परंतु आमचे सामान लुटले जात होते. घाबरून आम्ही त्याच दिवशी निघायचे ठरविले. पहाटे सहाच्या आतच आम्ही मिशनमधील सामान घेऊनदोन स्त्रिया व एक पुरुष असे आधी ठरलेल्या बोटीच्या दिशेने निघालो.


आमच्या मागे मुलांची हळू हळू गर्दी जमू लागली. "मुर्दाबाद मुर्दाबाद," "ठार करा, ठार करा, " अशा घोषणा देत जमाव आमच्या मागे लागला. परंतु या वेळपावेतो आमच्या परिस्थितीची बातमी संघटनेला कळली असावी. संघटनेचे काही अधिकारी ताबडतोब आमच्या रक्षणासाठी काही शिपाई घेऊन आले.

आम्ही बोटीत बसून निघालो. पण आमची बोट सुमारे दहा किलोमीटर गेली असेल नसेल तोच मागून येऊन एका बोटीने आम्हांला गाठले. त्यात संघटना पुढारी नियेह होता. तो म्हणाला, "तुम्ही लवकर निघाल्यामुळे तुम्हांला २०० डॉलर्स देणे तसेच राहून गेले. ते देण्यासाठी मुद्दाम आलो आहे." नंतर त्याने नावाड्याला आम्हांला सुरक्षित घेऊन जाण्याविषयी सूचना दिल्या. पुढे दोन दिवसांनी वाटेत काहीच त्रास न होता आम्ही चांगशा शहरी पोचलो.

पुढे काही दिवसांनी बंड दडपले जाऊ लागले. कोमिन्टांगचे लष्करी सैनिक खेडोपाडी जाऊ लागले. त्याबरोबर या सैनिकांच्या आधी आपण पोचून लुटालुटीतून मिशन वाचवावे म्हणून चांगशात जमलेल्या साऱ्या मिशनऱ्यांनी आपापल्या गावी धाव घेतली. परंतु सियांग सियांगचे मिशनरी आपल्या मिशनमध्ये पोहचताहेत तो सैनिकांनी सारी दारे फोडून मिशनवर कबजा मिळविला होता. आलेल्या मिशनऱ्यांना मोठ्या मिनतवारीने दोन लहान खोल्या वापरण्यासाठी देण्यात आल्या. बाकी साऱ्या खोल्या आणि सामान सैनिक वापरीत होते. दोन आठवड्यांनी क्रांतिकारक शेतकऱ्यांच्या पाठलागावर जाण्यासाठी म्हणून सैनिकांनी मिशन सोडले. पण जाताना ते अक्षरशः धुऊन काढले. आत एक वस्तू शिल्लक ठेवली नाही.

सियांग सियांगच्या शेतकरी संघटनेने आपल्या जिल्ह्यात पकडलेल्या सुमारे २० जणांवर खटले भरून त्यांना देहांत शासनाची शिक्षा दिली.

परंतु नंतर त्यांना दडपण्यासाठी आलेल्या सैनिकांनी सर्वत्र दशहतीचे वातावरण पसरविले. संघटनेच्या सर्व पुढाऱ्यांचे त्यांनी शिरकाण केले. मिशनसमोरच तीस जणांना ठार मारताना मिशनऱ्यांनी पाहिले. कुणाला ठार मारले जात आहे याची विशेष चौकशी होत नव्हती. सरसहा कत्तल होत होती. कठोरपणे शेतकऱ्यांची चळवळ दडपली जात होती. [अपूर्ण]



"कपड्यांत लाज गुंडाळून वावरणारी संस्कृती
कलिंगांचा हा आनंद कधीतरी हिरावून घेणार
या कल्पनेनं मन क्षणभर खिन्न झालं"



विजय परुळकर




# कॉफीच्या
# रंगाच्या
# त्या तरुणींनी

## कुठल्याही अमेरिकन नटीला सौष्ठवात मागे टाकलं असतं !







पावाच्या तुकड्याबरोबर
संस्कृतीचा वारसा देणाऱ्यांना
कलिंगांनी आजपर्यंत तरी
रोखून धरलय !

# कलिंगांच्या प्रदेशात


निवेदन व छायाचित्रे : विजय परूळकर

लेखक : अनिल हवालदार

जाझ संगीताचा कल्लोळ उसळला होता. कावलूनच्या 'ओशन-बार'मधली प्रत्येक व्यक्ती संगीतानं आणि मद्यानं धुंद झाली होती. सिगरेटच्या धुरानं वातावरण घुसमटलं होतं ! गोऱ्या कातडीबरोबर हाँगकाँगच्या 'सुझी-वाँग' नाचताना दिसत होत्या. 'पूर्वेचं पॅरिस' समजल्या जाणाऱ्या हाँगकाँग नगरीतल्या 'निशाजीवना'ला बहारदार रंग चढला होता. आणि ते रंग माझ्या मूव्ही कॅमेऱ्याने टिपून 'आशियातले निशाजीवन' या जर्मन टेलिव्हिजनसाठी तयार करीत असलेल्या लघुपटाला शेवटचा आकार आणण्यात मी गर्क होतो. कुणीतरी शँपेनची बाटली फोडली आणि त्याच वेळी कॅमेऱ्यातली फिल्म संपली ! माझं काम संपलेलं होतं ! 'आशियातलं निशाजीवन' चित्रीत करताना मी चांगलाच रंगलो होतो—रमलो होतो ! हाँगकाँगचा निरोप घेणं अगदी जिवावर आलं होतं ! 'निशाजीवना'सारख्या रंगेल विषयानंतर माझ्या पुढच्या फिल्मचा विषय अंगावर काटा आणणारा होता—'फिलिपाईन्समधील माणसांची मुंडकी मारणाऱ्या जमाती !'

'निशाजीवना'च्या फिल्मची भेंडोळी दिल्लीच्या आमच्या ऑफिसकडे रवाना करून अस्मादिक थोड्याशा मरगळल्या मनानेच 'मनिला'मध्ये उतरले. प्रत्येक शहराला एक 'मूड' असतो. या 'मनिला' शहराला 'मूडच' नाही ! अगदी ठोकळ्यासारखं शहर ! आखीव रस्ते, स्वच्छ हॉटेलं, आदबशीर माणसं ! त्या माणसांच्या काळजीने ओढलेल्या चेहऱ्यावरचं हसू लटकं, खोटं वाटलं—वाटलं त्यांनी हसूच नये बुवा ! हाँगकाँगनंतर 'मनिला' मध्ये राहण्याचा हा 'कॉन्ट्रास्ट' मला जरा जडच गेला ! रात्रभर रिमझिम चालू होती आणि समुद्रकाठच्या हॉटेलच्या माझ्या 'एअरकंडिशंड रूम'मध्ये मी उदासवाणा बसून होतो. 'मुंडकी मारणारी माणसं' चितारताना आपलंच मुंडकं तिथली शोभा तर वाढवणार नाही ना, या विचारानं अधूनमधून त्या 'थंड' वातावरणातही घाम फुटल्याचा मला भास होत होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी 'मुंडकी मारणाऱ्या माणसां'ना भेटण्यासाठी मी निघालो



कलिंग प्रमुख
मी दिलेल्या सिगारचे
झुरके मारीत होता

पीटर नावाचा एक चलाख फिलिपाईन ड्रायव्हर मला मिळाला होता. या प्रवासात वाटाड्या–दुभाष्या अशा अनेक भूमिका तो पार पाडणार होता. माझं चित्रीकरणाचं साहित्य मी जीपमध्ये भरलं! सामान वाहून न्यायला मदतीसाठी आणखी दोन पोरं घेतली आणि फिलिपाईन्सच्या रानटी जमातींना 'फिल्म'वर 'शूट' करायला मी रुजू झालो.

रस्ता अवघड होता. तीन दिवसांच्या 'जीप-चाली' नंतर आमचा त्या रानटी जमातींच्या प्रदेशात 'प्रथम-प्रवेश' होणार होता. वाटेत बागिओ (Bagiuo) गावाजवळचा अमेरिकेने उभारलेला 'क्लार्क्स बेस' पाहिला. त्याच्या आसपास हॉलीवुडची ख्यातनाम नटी ऊर्सूला अँड्रेस कसल्यातरी चित्रपटाच्या शुटिंगसाठी आली होती. पण तिला पाहत बसायला वेळ नव्हता. नटीच्या दर्शनाने घायाळ झालेल्या पीटरला पुढच्या प्रवासाला उद्युक्त करायला माझ्या प्रचंड वजनातलं अर्धा पौंड वजन घटलं!

प्रवासाचा दुसरा दिवस चालला होता. 'माऊंट दत्ता' नावाचा पर्वत आम्ही ओलांडला. सबंध डोंगरउतार भातशेतीने फुलून गेले होते. भाताची हिरवीगार शेतं नजरेला सुखवीत होती. हिरव्या शेतांवर निळे डोंगर डोकावत होते. अशा निसर्गसुंदर प्रदेशात माणसं 'मुंडकी' का मार-

तात, असा एक मूर्ख प्रश्न डोक्यात उगीचच चमकून गेला. ती बिकट वाट पीटर मोठ्या कौशल्याने कापीत चालला होता.

## ख्रिश्चन मिशनरी आहेतच !

बॉन्टॉक (Bontoc) या ठिकाणी आम्ही दुसरा मुक्काम केला. बॉन्टॉक या नावाची रानटी जमातही तिथे राहते. फिलिपाईन्सच्या उत्तर भागात तीन जंगली जमाती प्रामुख्याने ओळखल्या जातात. बॉन्टॉक, दफुगाओ आणि कलिंग ! बेल्जियममधून आलेल्या मिशनऱ्यांनी बॉन्टॉक जमातीला सतत प्रयत्नांनी सुधारलं आहे. बहुतेक बॉन्टॉक टोळीवाल्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला आहे. दफुगाओ ही मुंडकी मारणारी जमातही मिशनऱ्यांनी आपलीशी केली आहे. परंतु कलिंग जमातीने मात्र 'आकाशातल्या बापा' ला देव मानायला नकार दिलाय ! आतापर्यंत तिथे गेलेल्या सहाही मिशनऱ्यांची त्यांनी मुंडकी मारली ! परंतु प्रियाराधनासाठी माणसांची मुंडकी मारायची पद्धत आता कमी होत आहे, असा पीटरने मला दिलासा दिला. त्याच्यावर विश्वास ठेवण्याशिवाय मला दुसरं गत्यंतर नव्हतं !

बॉन्टॉकच्या मुक्कामात मला एक वल्ली भेटली. 'बिल बायर्स इन्' नावाचं तिथं एक हॉटेल आहे. त्याच्या मालकाची—बिल् बायरची—कथा गंमतीची आहे. बऱ्याच वर्षांपूर्वी तिथे एक जर्मन समाजसुधारक येऊन राहिला. त्यानं तिथल्या जमातीतल्या बाईशी लग्न केलं ! बिल् हा त्या जर्मन-बॉन्टॉक जोडप्याचा मुलगा ! या बिल्-नेही वन्य जमातीमधल्या एका मुलीशी लग्न केलंय ! तिथं येणाऱ्या प्रवाशांना 'रानटी जमाती दाखवतो' असे सांगून हा बिल् बरेच पैसे उकळतो आणि 'सुधारलेल्या लोकांना' थोडा वेळ 'रानटी' बनवून प्रवाशांची फसवणूक करतो. पीटरला त्याची ही युक्ती माहिती असल्याने मी वचावलो. नाहीतर तिथल्याच सुधारलेल्या लोकांची 'फिल्म' घेऊन लोकांना 'रानटी जमाती' म्हणून दाखवीत अस्मादिक फिरले असते !

आमच्या प्रवासाचा शेवटचा टप्पा सुरू झाला. एक दरी ओलांडली आणि 'फडाड्' आवाज होऊन आमच्या गाडीचं पुढचं चाक खालीच बसलं ! खाली उतरून बघतो तो दुसरं टायरही पंक्चर झालेलं ! आसपासच्या कित्येक मैलांपर्यंत कुठल्याही माणसाची चाहूल लागणं कठीण ! पीटरला परत बिल् बायर्सच्या हॉटेलापर्यंत पायपीट करीत जाणं भाग होतं ! बरोबरच्या दोन पोरांना घेऊन तो टायर्स आणायला गेला आणि मी रामरक्षेपासून सगळी स्त्रोतं म्हणायला सुरुवात केली. गाडीत बसून बसून पायाला मुंग्या आलेल्या होत्या ! पण बाहेर पडायचा धीर होत नव्हता ! न जाणो एखादा भाला मुंडकं उडवून गेला तर ? आपल्या सगळ्या तेहतीस कोटी देवांची नावं घेऊन झाली ! तरी पीटरचा पत्ता नाही ! एकदा वाटलं— फसवलं वाटतं बेट्यानं ! मला जंगली लोकांच्या तावडीत सोडून मुद्दामच

गला ! पुन्हा दुसरं मन म्हणालं— ' बेटचा पीटर, मला फसवून काय तुला मिळणार ?' जन्मजात धाडसी स्वभावाला अनुसरून ही कामगिरी पत्करली होती, तरी मधूनमधून अनामिक भीतीचा काटा अंगावरून सरसरून जात होता.

संध्याकाळ झाली. लहानपणी शाळेत ड्रॉइंगच्या वहीत ' सूर्यास्ताचा देखावा ' काढीत होतो तसे दृश्य समोर दिसत होते. मी सशासारखा गाडीत बसून होतो. एवढ्यात कुणाची तरी चाहूल लागली, छाती धडधडायला लागली. डोळे नकळत गच्च मिटले गेले. पावलांचा आवाज गाडीपाशी येऊन थांबला. अजून माला घुसला नाही म्हणून मी हळूच डोळे किलकिले करून पाहिले ! पीटर परत आला होता !

## आमची वरात

बुग्नाईला (Bouganai) आमच्या मोटारच्या प्रवासाचा शेवटचा टप्पा होता. तिथून एक दरी ओलांडून ३॥–४ मैलांची पायपीट केली म्हणजे कलिंगांच्या प्रदेशात आम्ही पोचणार होतो. पीटरच्या सूचनेबरहुकूम मी कालिंगांच्या प्रमुखाला भेट देण्यासाठी दोन गुबगुबीत डुकरे घेतली होती. शिवाय जिनच्या डझनभर बाटल्या, सिगार्स, सिगरेटस्, काड्यापेट्या, साखर, आरसे असा भरगच्च नजराणा होताच !

बुग्नाईला पीटरने आणखी दहा बारा बॉन्टॉक पोरं बरोबर घेतली आणि आमची पदयात्रा सुरू झाली. पावसाची झिमझिम सुरू झाली होती. ती बॉन्टॉक पोरं माझा कॅमेरा आणि इतर संसार सांभाळत चालली होती. चौघांनी उलटचा काठीवर टांगलेल्या डुकरांना खांद्यावर घरलं होतं ! वाटेत ओढा लागला. चांगलं कमरेएवढं खोल पाणी होतं ! ह्या वेळचं धाडस चांगलंच अंगाशी येणारसं वाटायला लागलं ! वाट निसरडी झाली होती. पीटर मुकाटपणे सर्वांच्या पुढं चालत होता. थोड्या वेळानं त्या पोरांनी कसलंतरी गाणं नाकातल्या सुरात म्हणायला सुरुवात केली. त्या एकसुरी गाण्यात ती दोन डुकरं मधून मधून आपला ' आवाज ' मिसळत होती. आमची वरात कलिंगांच्या खेड्यापाशी पोचली तेव्हा रात्रीचा एक वाजला होता !

तीन दणकट तपकिरी रंगाच्या कलिंगांनी (त्यांचा रंग टॉर्चच्या प्रकाशात पाहिला ! ) आमची ' वरात ' थांबवली. पीटरने त्यांच्या भाषेत बरीच बडबड केली. हातवारे करून त्याने माझ्याकडे आणि कॅमेऱ्याकडे बोट दाखवून आमच्या आगमनाचा हेतू स्पष्ट केला असावा ! त्यांना आमचा विश्वास पटला ! त्यांच्या रागीट मुद्रा किंचित हसऱ्या झाल्याचा मला भास झाला ! मीही उगीचच हसून दाखवलं ! पण खरं म्हणजे जीभ सुकून कोरडी पडली होती आणि पॅन्टमध्ये पाय लटलटा कापत होते.

बांबूच्या काड्यांवर उभ्या केलेल्या अनेक झोपड्या माझ्या दृष्टीस पडल्या. त्यांतली एक झोपडी त्यांनी मला राहायला दिल्याचे पीटरने सांगितले. माझी भीती

हळू हळू कमी होत होती. इंग्रजी सिनेमांत दाखवतात तसे ढोल बडवून ही माणसं नाचत नव्हती ! परका माणूस आला म्हणून फेर धरून घाबरवत नव्हती ! अगदी पुण्याच्या 'पाव्हण्याचं' कोल्हापुरात स्वागत व्हावं तसा सगळा मामला चालला होता. तरीही शंकेखोर मन ते मोकळं, निर्भय स्वागत मानायला तयार नव्हतं ! चोरट्या नजरेनं मी कुठं 'मुंडकी' लटकलीत का काय ते पाहत होतो !

त्या झोपडीत काहीही सामान नव्हतं ! नुसती मोकळी खोली ! माझ्याच पथारीवर अंग टाकलं ! पण झोप येईना ! पीटरनं माझ्या सोबतीला एक पोरगा बसवून ठेवला होता. तो बसल्या बसल्या पेंगत होता. पीटरच्या आणि त्या तीन कलिंग तरुणांच्या गप्पा रंगात आल्या होत्या. भेदरलेलं मन केव्हा थकलं आणि शरीराबरोबर झोपलं ते समजलंच नाही !

## टोळी प्रमुखाची भेट

पहाटे पीटरनं मला गदगदा हलवून जागं केलं. टोळीच्या प्रमुखाला भेटायचा कार्यक्रम पार पाडायचा होता. मी आळस देत झोपडीबाहेर आलो. वस्तीत जाग आली होती. सर्वांच्या कमरेला एका लंगोटीवजा वस्त्राशिवाय अंगावर दुसरं काही नव्हतं ! प्रत्येक पुरुषाच्या हातांत एकएक भाला होता. बायकांनी अंगभर गोंदून घेतलेलं ! कॉफीच्या रंगाच्या त्या तरुणींनी कुठल्याही अमेरिकन नटीला सौष्ठवात मागे टाकलं असतं ! मला पाहून कुणाच्याही चेहऱ्यावर फारसं आश्चर्य दिसलं नाही—आठी दिसली नाही ! सगळेजण हसत होते ! भीतीनं लांबलेला माझा चेहराही हळूहळू पूर्ववत गोलाकार व्हायला लागला होता. मी भेट म्हणून आणलेल्या वस्तू त्यांच्या अंगाखांद्यावर दिसत होत्या.

टोळीच्या प्रमुखाला भेटायला मी पीटरबरोबर निघालो. पीटर एका झोपडीपाशी थांबला. मीही थांबलो. सहज नजर वर गेली ! सात-आठ कवट्यांची एक माळ दिसली. छातीतला 'धाडधाड' आवाज बाहेर कुणी ऐकू नये म्हणून हात छातीवर गच्च दाबून धरला. पीटरनं मला दिलासा दिला. घाबरट चेहऱ्यावर हसू पसरून मी आत गेलो. एक जख्ख म्हातारा मी आणलेली सिगार पेटवून मस्त झुरके मारत बसला होता. मी किंचित वाकून त्याला 'नमस्ते' केलं ! पीटरनं काहीतरी बडबड केली. त्यानं मान झुकवून स्मित केलं ! एका लाकडी भांड्यातून तो तांदळाची दारू पीत होता. त्यानं तेच भांडं माझ्यापुढं केलं ! मोठी पंचाईत आली ! भल्या पहाटे चहाऐवजी आंबवलेल्या तांदळाची दारू ? तीसुद्धा त्याच्या उष्ट्या भांड्यातून ? अंगावर काटा आला ! पण पटकन बाहेरची मुंडक्यांची माळ आठवली. आलेला काटा पटकन् गेला !! मी झटकन् भांडं उचलून ते आंबूस मद्य प्यालो ! घशात काहीतरी चमत्कारिक घडतंय असं वाटत असतानाही चेहऱ्यावर हसू पसरून दाखवलं ! शाळा-कॉलेजच्या रंगभूमीवरच थांबलेली माझी अभिनयकला भलतीच 'पॉवरफुल' असावी ! मला ती दारू आवडली, असं समजून पुन्हा

मांडं भरलं गेलं ! पुन्हा पिऊन मी हसून दाखवलं ! माझा हा हसण्याचा उद्योग बराच वेळ चालत होता, हे संध्याकाळी पीटरनं हसून गडाबडा लोळत सांगितलं तेव्हा माझा चेहरा भलताच गंभीर झाला होता !

## संस्कृतीचे आक्रमण

माझ्या दोन दिवसांच्या मुक्कामात त्या ' मुंडकी मारणाऱ्या माणसां 'नी मोठ्या प्रेमळपणानं माझा पाहुणचार केला. मीच आणलेल्या डुकरांचं भाजलेलं मांस खाणं आणि ती तांदळाची दारू पिणं एवढ्या दोन भयानक गोष्टी सोडल्या तर माझा बाकीचा वेळ अगदी मजेत गेला. माझ्या फिल्मसाठी रात्री त्यांनी शेकोटीभोवती त्यांचा खास ' नाच ' करून दाखवला. आम्ही यायच्या आदल्याच दिवशी शेजारच्या टोळीशी त्यांची चकमक उडाली होती म्हणे ! त्यात शेजारच्या टोळीतला एक माणूस मारला गेला होता आणि त्यांच्यातला एक जखमी झाला होता. [ ही आदल्या दिवसाची गोष्ट पीटरने मला परतीच्या वाटेवर सांगितली ! ] त्या जखमी माणसाच्या औषधोपचाराची पद्धत मी चित्रीत केली. आपल्याकडे आजाऱ्यावरून लिंब–लोण किंवा कोंबडं ओवाळून टाकतात तसं त्यांनी त्या जखमी कलिंगावरून कोंबडं ओवाळून टाकलं !

त्या सगळ्या झोपड्यांत एक मोठी हॉलवजा झोपडी होती, पीटरने खुलासा केला—

" ही त्यांची शाळा आहे. मूल आईच्या अंगावरून वेगळं झालं की त्याला मोठं होईपर्यंत इथंच राहावं लागतं. भाला चालवणं–शेती करणं असल्या गोष्टी शिकवल्या जातात ! ज्या वेळी एखाद्या तरुणाला एखाद्या तरुणीशी लग्न करावंसं वाटेल तेव्हा त्याला दुसऱ्या जमातीतल्या माणसाचं मुंडकं मारून आणावं लागतं. ते मारून आणलेलं मुंडकं त्यानं त्या तरुणीच्या झोपडीसमोर लटकावलं की झालं त्याचं लग्न ! लग्नाची ही ' हिंसक कथा ' पीटर सांगत असतानाच टोळीप्रमुखाची अग्नाई नावाची तरुण मुलगी समोरून येत होती. गेले दोन दिवस ही अग्नाई बालिश औत्सुक्यानं माझ्या कॅमेऱ्याभोवती घुटमळत होती. मीही हातवाऱ्यांनी तिला कॅमेऱ्याचा ' मेकॅनिझम ' समजावून देत होतो. पण कलिंगकन्येच्या स्वयंवराचा हा पण ऐकताच माझा उत्साह गोठला होता. त्याच दिवशी आमचा मुक्काम हलविला !

धडधडत्या काळजानं ' मुंडकी मारणाऱ्या माणसां 'च्या प्रदेशात मी प्रवेश केला होता. जाताना मात्र निश्चित आणि निर्भय मनानं जात होतो. परतीच्या वाटेवर असताना त्यांचे हसरे बालिश चेहरे नजरेसमोर तरळत होते. पावाच्या तुकड्याबरोबर संस्कृतीचा वारसा देणाऱ्यांना कलिंगांनी आजपर्यंत तरी रोखून धरलंय ! जीवनातल्या निर्मळ-निरागस आनंद ते लुटताहेत ! ' कपड्यांत लाज गुंडाळून वावरणारी ' संस्कृती त्यांचा हा आनंद कधीतरी हिरावून घेणार या कल्पनेनं मनं क्षणभर खिन्न झालं !

● ● ●

## पुस्तके



### □ अभ्यासपूर्ण युद्धशास्त्रीय पुस्तक

युद्धशास्त्र हे एक शास्त्र आहे. ते जितके सामुदायिक, तितकेच व्यक्तिगत शास्त्र आहे. जितके निश्चित (Definite), तितकेच लवचिक (Flexible) आहे. युद्धक्षेत्राची भौगोलिक परिस्थिती, उभय सैन्यांचे बलाबल, लढाईच्या धोरणाचे स्वरूप याचबरोबर कुशल सेनापतीच्या योजना, त्याचे आडाखे, बचावात्मक आणि आक्रमक पवित्र्यांची योजकता यांना या शास्त्रामध्ये फार महत्त्व असते.

कॅ. शं. गं. चाफेकर यांच्यासारख्या अनुभवी युद्धशास्त्रविवेचकाने या छोट्या पुस्तकात युद्धशास्त्रीय दृष्टिकोनातून काही संग्रामांची छाननी केली आहे. प्रतापगडच्या धुमश्चक्रीतील शिवाजीमहाराजांचे अजोड योजनाकौशल्य, मॉण्टेनॉटच्या लढाईतील नेपोलियनचे युद्धकौशल्य, १९४० मध्ये जर्मन सैन्याने फ्रान्समध्ये माजविलेली रणगाड्यांची रणधुमाळी, दुसऱ्या युद्धात वेव्हेलने यशस्वीपणे आखलेली पहिली लिबियन मोहीम, मंडाले–मेकतिलाचा नमुनेदार रणसंग्राम यांचे विश्लेषण चाफेकरांनी शास्त्रीय काटेकोरपणाने केलेले आहे. देशावर किंवा जगाच्या इतिहासावर महत्त्वाचा निर्णायक परिणाम घडविणाऱ्या या पाच युद्धांचे हे अभ्यासपूर्ण विवेचन आहे. या संग्रामात युद्धशास्त्रातील जास्तीत जास्त तत्त्वे कशी वापरली गेली, त्यामुळे विशिष्ट पक्षाला जय आणि दुसऱ्या पक्षाला पराजय कसा व का मिळाला, याची चिकित्सा येथे केलेली आहे. चाफेकरांच्या व्यासंगपूर्ण विद्वत्तेमुळे हे विवेचन फार महत्त्वाचे झाले आहे. विशेषतः, परकीय संग्रामांचे विश्लेषण करतांनाही त्यांनी तेथील राजकीय, लष्करी आणि भौगोलिक परिस्थितीचा अगदी सूक्ष्म अभ्यास केलेला पाहून विशेष गौरव करावासा वाटतो.

मराठीमध्ये अशा अभ्यासपूर्ण पुस्तकांची बरीच वाण आहे. शिवछत्रपतींच्या रोमहर्षक चरित्रातील कित्येक वीरश्रीपूर्ण लढाया आबालवृद्धांना स्फूर्ती देत आल्या आहेत. पण त्या थोर पुरुषाच्या कृतींचे सर्वांगीण निरीक्षण करून आपण त्यांचे महत्त्व समजून घेत नाही. आपल्या बुद्धीवर भावनेचे पुट चढते. मग परकीयांच्या युद्धकौशल्याची चिकित्सा करणे तर दूरच. 'युद्धस्य कथा रम्या' याच दृष्टीने

केवळ युद्धाच्या हकीकतीकडे पाहिले जाते. त्याला अभ्यसनीय बाजूही असेल हे आपल्याला अजून माहितीच नाही.

म्हणून चाफेकरांच्या या पुस्तकासारखी पुस्तके विपुल संख्येने व्हावयास पाहिजेत. वाचली जायला पाहिजेत. सरदेसाई यांची मराठी रियासत, शिवभारत, डॉ. बाळकृष्ण, जदुनाथ सरकार यांचे व जॅक्सन, बर्टन, अॅबोट, लुडविग यांचे इंग्रजी ग्रंथ यांसारखी पुस्तके चाफेकरांनी आपल्या निष्कर्षांच्या आधाराला घेतलेली आहेत. एखादे प्रमेय सोडविल्याप्रमाणे सैन्याच्या भिन्न हालचालींची आणि परस्परपूरक धोरणांची मुद्देसूद संगतवार चिकित्सा ते करतात. परकीय रणभूमीची पार्श्वभमी ते जेव्हा विशद करतात तेव्हा तिथली भौगोलिक, लष्करी आणि राजकीय परिस्थितीची जाणीव स्पष्ट होते. या पार्श्वभूमीवर युद्धांच्या तपशीलाची मीमांसा सुस्पष्ट होते. प्रत्येक मीमांसेच्या उपसंहारात चाफेकरांनी आपले निष्कर्ष मांडले आहेत. "युद्धेतिहासाचा सूक्ष्म अभ्यास, मानसशास्त्राचे ज्ञान, आपल्या फौजेचा वकूब, शत्रूच्या हालचालींची बित्तंबातमी, सुस्पष्ट युद्धध्येय, तडफेच्या हालचाली, उत्कृष्ट अधिकारीवर्ग, प्रसंगानुसार रणनीतीत बदल करण्याची क्षमता, सैन्याच्या सर्व भागांवर सतत नियंत्रण......" इत्यादी अनेक गोष्टींचे युद्धशास्त्रीय महत्त्व काय आणि यांपैकी कोणत्या गोष्टीमुळे कोणत्या युद्धाला कशी कलाटणी मिळाली याचे मार्मिक विवेचन त्यांनी केलेले आहे.

कोणत्याही अभ्यासू वाचकाचे या पुस्तकाने समाधान होईल. काहीतरी रोमहर्षक, प्रक्षोभक कहाण्या वाचण्याच्या अपेक्षेने प्रस्तुत पुस्तक वाचणारा मात्र कंटाळून जाईल.

**[ 'संस्मरणीय संग्राम' – कॅ. शं. गं. चाफेकर – ज्ञानराज प्रकाशन – चार रुपये. पृष्ठे १४८ भा. १ ]**

## ☐ हकीकतीवजा गोष्टी

श्री. टोळ यांची बालवाङ्मयाची काही पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. या पुस्तकातील गोष्टी त्यांनी मोठ्या माणसांसाठी पहिल्यांदाच लिहिलेल्या आहेत. "पहिल्यावहिल्या कथा ह्या बहुधा चाचपडत लिहिलेल्या असतात. कच्चा माल तसाच राहिलेला असतो. लिहितालिहिता प्रौढपण येते आणि पक्केपणाही येतो." या व्यंकटेश माडगूळकरांच्या प्रस्तावनेतील वाक्यांचा प्रत्यय पुस्तकातील सगळ्या गोष्टींमध्ये येतो. श्री. टोळ अजून बरेच चाचपडत आहेत. वर्णने आणि भाषाशैली कुठेच कथेला अंगभूत वाटत नाहीत. चिकटवल्यासारखी वाटतात. कुठे कुठे श्री. टोळ एखाद्या समर्थ लेखकाप्रमाणे पान लिहून जातात; पण पुढे हा आवेश गळून पडतो आणि गोष्टीला 'हकीकती'चे स्वरूप येते. श्री. टोळ यांचे वाङ्मयीन व्यक्तित्व कुठेच दिसत नाही. वर्णनाच्या भरात कित्येकदा साध्या चुका झालेल्या आहेत.

"त्यांच्यापैकी जी सर्वांत सुंदर होती ती गात होती व बाकीच्या तिला तबला (?) पेटीची साथ देत होत्या." (सूड) तरुण मुली 'पेटी वाजवितात. तबला वाजविणाऱ्या विरळाच.

'घुंटर ऽ घूं ऽ', 'पाळणा' व 'लक्ष्मीपूजन' या बऱ्या गोष्टी. श्री. टोळ यांच्या भावी प्रतिभेची चुणूक यातूनच दिसते. 'घुंटर ऽ घुं ऽ ही वेगळ्या जीवनावर-पक्षीयुगुलावर– आधारलेली, 'पाळणा' ही कौटुंबिक वातावरण चांगले निर्माण करणारी आणि 'लक्ष्मीपूजन' ही सरळधोपट पण चांगले मनोलेखन करणारी. या गोष्टीतून दिसणाऱ्या प्रतिभेचा अंकुर श्री. टोळ यांनी जोपासाला पाहिजे.

['एका वेड्याने एकदा..' – दत्ता श्री. टोळ – ललित प्रकाशन – मूल्य दोन रुपये पंच्याहत्तर पैसे – पृष्ठे ८०]

–निशिकांत मिरजकर

## □ एक उपयुक्त मार्गदर्शक

आतापर्यंत फोटोग्राफीच्या विषयावर अनेक विद्वानांची अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. पण त्यांतले ज्ञान फक्त अनुभवी व धंदेवाईक लोकांकरिताच आहे. साध्या बॉक्स कॅमेऱ्यावर हौसेने सहली, समारंभ वगैरे चित्रीत करणाऱ्या आमच्या हौशी छायाचित्रकारांकरिता सोप्या भाषेतील एकही पुस्तक उपलब्ध नव्हते. श्री. मोहनलाल मालाणी यांच्या 'फोटोग्राफीचा मार्गदर्शक'-याने ही उणीव भरून काढली आहे.

फोटोग्राफीचा इतिहास, कॅमेरे, त्यांचे प्रकार, फिल्मची निवड, प्रकाशाचे तंत्र, डेव्हलपिंग, प्रिंटिंग, एन्लार्जमेंट, व्यक्तिचित्र, समूहचित्र वगैरे अनेक गोष्टींची बारीक सारीक माहिती या पुस्तकात दिलेली आहे. लेखकाने स्वतःला आलेले अनुभव जमेस धरून हे पुस्तक लिहिल्यामुळे जे नेमके हवे, ते या पुस्तकात आले आहे.

श्री. मोहनलाल मालाणी यांनी हौशी छायाचित्रकारांना हौस करता करता चार पैसेही कसे मिळवायचे याचे मार्ग या पुस्तकात दिले आहेत. सध्या लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनी पुस्तकाचे साहाय्य घेऊन फोटो घेणे सुरू करावे. ते त्यांना निश्चित उपयुक्त ठरेल.

श्री. मालाणी यांच्या बुधवार पेठेतील दुकानात हौशी चित्रकारांची बरीच गर्दी असते. मालाणी त्यांच्या शंका दूर करतात व त्यामुळेच पुस्तक लिहिताना नेमक्या अडचणी कोणत्या आहेत हे त्यांना सहज ध्यानात आले व त्याचेच निरसन त्यांनी आपल्या पुस्तकात केले आहे.

['फोटोग्राफीचा मार्गदर्शक'– मोहनलाल मालाणी व अण्णा गोखले–ऑपेरा फोटो स्टुडिओ प्रकाशन–सहा रुपये–पृष्ठे ११४.]

–अ. वि. गणपत्ये




लेखक : एल्. सी. मोझिस.

अनुवादक : अशोक खरे.

*दुसऱ्या महायुद्धाचा काळ. युद्धाचा विस्तार त्रिखंडात झाला होता. दोस्तांच्या सेना इटलीत उतरल्या होत्या. एक वर्षापूर्वीच क्रिमियात घुस लेल्या व स्टॅलिनग्राडवर धडक मारणाऱ्या जर्मन मुसंडीस तोंड देताना ज्यांची पळता भुई थोडी झाली, तेच रशियन्स आता वेगाने पुढे सरकत होते. हिटलरचे प्रचंड युद्धतंत्र मोडकळीस येत होते.*

*आणि याच सुमारास तुर्कस्थानात 'ऑपरेशन सिसेरो' आकार घेत होते. अंकारातील जर्मन वकिलातीत एल्. सी. मोझिर्स यांची दुय्यम परराष्ट्रमंत्री म्हणून नेमणूक झाली. मोझिर्स यांनी पुरवलेल्या गुप्त माहितीचा जर्मन सेनापतींनी योग्य उपयोग करून घेतला असता तर युद्धाचे पारडे फिरण्याचा दाट संभव होता. पण तसे झाले नाही—*

*ही संपूर्ण कथा 'माणूस'च्या वाचकांना या अंकापासून सादर केली जात आहे.*

अंकारातील शरद ऋतू विलक्षण सौंदर्याने नटलेले असत. सर्वत्र पसरलेल्या विस्तीर्ण निळ्या गर्द आकाशातील शांतता व त्याचप्रमाणे हवेतील उष्णता व सूर्यकिरणे आम्हांस अतिशय आल्हाददायक वाटत.

२६ ऑक्टोबरची सकाळ इतर दिवसांपेक्षा वेगळी अशी नव्हती. ऑफिसातील काम संपवून मी जरा लौकरच घरी परतलो. जरा वाचन केल्यावर दिवे मालवून पलंगावर लवंडलो व निद्रादेवीच्या आधीन होणार तोच टेलिफोन खणखणला. रिसीव्हरकडे जाईपर्यंत मी झोपेतच होतो.

"तुम्ही ताबडतोब आमच्या खोलीवर याल काय?" दुसऱ्या बाजूने एक चितायुक्त आवाज आला. हा आवाज सौ. जेंके – वकिलातीतील चिटणिसाच्या बायकोचा–होता. मी बिछान्यावर असल्याचे सांगितले व हे काय गौडबंगाल आहे म्हणून विचारले.

"अत्यंत जरूरी आहे. कृपया लगेच निघून यावे," ती म्हणाली. तोपर्यंत पत्नीही उठली होती. बहुधा बर्लिनचा विचित्र संदेश असावा दुसरे काय! मी कपडे घातले. घड्याळात पाहिले. रात्रीचे १०॥ वाजले होते.

थोड्याच वेळात मी जर्मन वकिलातीत पोचलो. अर्धवट झोपेतल्या तुर्की द्वाररक्षकाने भले मोठे लोखंडी दार उघडले. मी घराजवळ आलो. बेल दाबली. दार उघडले गेले.

"हे आताच झोपायला गेलेत. अगदी सकाळीच ते तुम्हांला भेटतील," ती

म्हणाली व पुढे दिवाणखान्याकडे अंगुलीनिर्देश करीत म्हणाली,

"दिवाणखान्यात अतिशय विलक्षण माणूस बसला आहे. तो कशासाठी आला ते सांगत नाही. ही काय भानगड आहे, ते तुम्हीच पाहा बरं. पण जाताना बाहेरचे दार लावण्यास विसरू नका." श्रीमती जेंके निघून गेली. आता मी दिवाणखान्यात एकटाच होतो. ऐन मध्यरात्री एका अनोळखी इसमाबरोबर मुलाखत घेणे हे खरोखरच दुय्यम सेक्रेटरीचे काम आहे काय, याबद्दल जरा शंका आली तरी मुलाखत थोडक्यातच आवरायचे ठरवले.

## सिसेरो भेट

मी दिवाणखान्यात शिरलो. त्या भव्य दिवाणखान्यात खालपर्यंत पडदे सोडलेले होते. आणि फक्त टेबल-लँपचा प्रकाश असल्यामुळे दिवाणखाना अधिकच सुखकारक वाटत होता. टेबलाजवळ अंधारात तोंड लपवलेला एक इसम बसला होता. तो उठून उभा राहिला व मला फ्रेंचमध्ये म्हणाला,

"आपण कोण ?" मी सर्व काही सांगितले. माझ्या अंदाजाप्रमाणे तो पन्नाशीच्या घरात असावा. कपाळापासून सरळ मागे वळलेले राठ काळे केस, निश्चयीपणा दाखवणारी त्याची ती हनुवटी, ओबडधोबड नाक असे एकंदर अनाकर्षक असे व्यक्तिमत्त्व होते ते. क्षणभर शांतता पसरली. हा इसम नक्कीच राजकारणी नसावा.

मी खाली बसलो. तो दाराजवळ गेला. खसकन् दार उघडले, पुन्हा मिटले व सुटकेचा निःश्वास टाकून खुर्चीवर येऊन बसला. तो खरोखरच विलक्षण माणूस वाटला मला त्या वेळी. मोडक्या तोडक्या फ्रेंचमध्ये तो म्हणाला,

"मला जर्मनांना एक सूचना करावयाची आहे; परंतु ती काय आहे हे सांगण्यापूर्वी तू तुझ्या वरिष्ठांव्यतिरिक्त कोणाकडेही या गोष्टीची वाच्यता करणार नाहीस, याची मला हमी पाहिजे. तुझ्याकडून तसा अविवेक झाल्यास माझ्याप्रमाणेच तूही किंमतशून्य ठरशील." त्याने जळजळीत कटाक्ष टाकला व विचारले, "आहे कबूल ?"

"अर्थातच ही देतो हमी. एखाद्या गोष्टीची गुप्तता राखणे मला समजत नसेल तर इथे मी राहीनच कसा ? तुला काय सांगायचे आहे ते सांग बघू." मी म्हणालो.

"एकदा तुम्हांस समजले की मी कशासाठी इथे आलो आहे, की तुम्हीच मला भेटण्याचा प्रयत्न कराल. माझी सूचना तुम्हांला अत्यंत महत्त्वाची वाटेल. मी..." तो गोंधळला कदाचित् भाषेच्या अडचणीमुळे अथवा माझी प्रतिक्रिया जाणून घेण्याच्या उद्देशाने असेल. "...मी तुला अत्यंत गुप्त कागदपत्रे देऊ शकतो. ती ब्रिटिश वकिलातीतील आहेत."

चेहऱ्यावरील उत्कंठा दाबण्याचा मी प्रयत्न केला. मला वाटले, आला असेल पैशाच्या लोभाने. माझी काळजी त्याने जाणली. तो म्हणाला,

"काम अती धोक्याचे असल्यामुळे मला त्यासाठी पैसा लागेल. मला वीस हजार स्टर्लिंग पौंडस् लागतील."

"कमाल आहे मूर्खपणाची. या भरमसाट किंमतीने प्रश्नच मिटला. हे कागदपत्र काय आहेत ते पाहण्याचे अगोदर निश्चित असे काहीच सांगता येत नाही."

त्याने आपला चेहरा अंधारात लपवला. चेहऱ्यावर एक प्रकारचे श्रेष्ठत्वाचे हास्य झळकलेले माझ्या डोळ्यांना आता स्पष्ट दिसत होते.

"गेली कैक वर्षे मी या दिवसाची तयारी करीत आहे. त्यामानाने मागितलेली किंमत फारच थोडी. ऐक, माझ्या अटी सांगतो. पटल्यास ठीकच. नाहीतर..." तो पुढे वाकला. डाव्या हाताच्या बोटाने माझे लक्ष खिडकीबाहेर वेधवीत म्हणाला, "...नाहीतर ते कागदपत्र समोरच्या इमारतीत जातील."

ती इमारत होती सोविएट वकिलातीची. क्षणभर शांतता पसरली व मग तो म्हणाला, "मी ब्रिटिशांचा द्वेष करतो."

मला वाटू लागले की, हा माणूस लफंग्या नक्कीच नाही. मी त्याला सिगरेट दिली. ती घेत, झुरके मारत मारत तो दाराजवळ गेला. कोणी नाही याची खात्री करून घेतली व माझ्या पुढ्यात उभा राहिला.

"मी कोण याची तुला उत्कंठा लागली असेल नाही का? अहो, नावात काय आहे. त्याचा कुठेच संबंध येणार नाही. ऐक, मी तुला तीन दिवस माझ्या सूचनेच्या विचारार्थ देतो. ३० ऑक्टोबरला दुपारी ३ वाजता मी फोन करीन. अर्थात् भेटायची जागा दुसरी असेल. तिथे मी तुला ब्रिटिशांच्या गुप्त कागदपत्रांची फिल्म देईन व त्यावद्दल मी २,०००० पौंड. लक्षात ठेव त्या भेटीत प्रतिसाद दिल्यास अशा अनेक फिल्म्स देईन व त्यांबद्दल १५,००० पौंड घेईन."

त्याने सर्व दिवे मालवण्यास सांगितले. मी त्याला दारापर्यंत पोचवण्यास गेलो. एकदम त्याने माझा हात पकडला व कानांत कुजबुजला, "मी कोण आहे माहीत आहे? मी ब्रिटिश वकिलाचा खाजगी नोकर आहे. मला पिअरी म्हण हवं तर."

माझी प्रतिक्रिया पाहण्याच्या अगोदरच तो अंधारात निघून गेला होता.

मी जेंकेंचे घर सोडले. त्या माणसाविषयीचे विचार माझ्या डोक्यात थैमान घालीत होते. इतके की मला झोपही येईना.

रात्रभरच्या जागरणाने दुसरे दिवशी डोके दुखू लागले. माझी आता खात्री झाली होती की, दुधखुळचा जर्मनांना जाळ्यात पकडण्याचे त्या भोंदूचे हे प्रयत्न आहेत. माझे मन आता मत्सराने पछाडले गेले. नंतर दीर्घस्नान केल्यावर थोडी कडक कॉफी घेतली. आता कुठे जरा बरे वाटत होते.

झालेली घटना पॅपेनला व बर्लिनला कळविण्यासाठी ऑफिसात जरा लौकर गेलो. सेक्रेटरी अजून आली नव्हती. त्यामुळे एकांतात पत्र खरडता आले. इतक्यात

श्री. जेंकेकडून फोन आला. मी घरी जातो तोच त्याने रात्रीच्या घटनेविषयी विचारले.

"फारच विचित्र सूचना बुवा !" मी म्हणालो.

"आहे माहीत मला. म्हणूनच त्यासाठी तुझ्यासारख्या हुशार माणसाची निवड केली. जे इतर करू शकत नाहीत तीच गोष्ट गुप्तहेर खात्यातील दुय्यम परराष्ट्रमंत्री ( Attache' ) आणि सर्वोच्च चिटणिसाची पत्नी ( First Secretary ) या करू शकतात."

माझ्या स्तुतीने मला गुदमरल्यासारखे झाले. काही बोलणार तोच वकीलसाहेबां-कडून बोलवणे आले. आम्ही दोघेजण पॅपेनच्या ऑफिसात शिरलो. साधीच परंतु अत्यंत चीने सजवलेली अशी ती ऑफिसची खोली व मध्यभागी देखणे असे पॅपेन बसले होते. त्यांच्या भेदक निळ्या डोळ्यांनी माझ्याकडे एक कटाक्ष टाकला.

"हं. बोला महाशय," ते म्हणाले.

"कालच्याच रात्रीची गोष्ट. जेंकेकडे ब्रिटिश वकिलाचा खास नोकर आला होता काल. त्याने फार महत्त्वाची सूचना केली आहे आपल्याला." इतके बोलून मी लिहिलेला अहवालच त्यांच्या पुढ्यात टाकला.

ते पत्र वाचू लागले, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरील बदलते भाव आपल्याला यात काहीच करता येणार नाही, असेच सांगत होते. शेवटी पॅपेन म्हणाले,

## रिबेन्ट्रॉपला पत्र

"या जबरदस्त पैशाच्या मागणीमुळे निर्णय घेणे आपले काम नाही. तावडतोब बर्लिनला पत्र लिहा व व्यक्तिशः मजकडे घेऊन या." अर्ध्या तासातच मी पत्र लिहून आणले.

"जरी शेवटी मला त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवणे भाग पडले, तरी खरं सांगायचं झाल्यास माझा ग्रह तितकासा चांगला झाला नाही. काहीही असो, माणूस फारच विलंदर दिसतो. त्या भेटीविषयीचे स्पष्ट मत मी दिले.

पॅपेनना मी पत्र दिले. त्यांनी थोड्या सुधारणा केल्या व मला वाचून दाखव-ण्यास सांगितले.

ते पत्रअसे होते--

"सचीव, परराष्ट्र मंत्री,

अत्यंत गुप्त

ब्रिटिश वकिलाचा खास नोकर म्हणवून घेणाऱ्या इसमाने ब्रिटिशांच्या गुप्त कागदपत्रांच्या फोटोची फिल्म् देऊ केली आहे. ती ३० ऑक्टोबरला मिळेल. त्यांबद्दल् २०,००० स्टर्लिंग पौंडांची त्याची मागणी आहे. पुढील प्रत्येक फिल्म रोलला १५,००० पौंड. कृपया काय करावे ते त्वरित कळवावे. होकार असल्यास

३० ऑक्टोबरच्या अगोदर खास विमानाने पैसे पाठवण्याची व्यवस्था करावी. हा नोकर श्री. जॅके व्यतिरिक्त कोणासही माहित नाही. आपला पॅपेन."

पत्राचे सांकेतिक भाषेत रूपांतर केले गेले व २७ ऑक्टोबरला ते बर्लिनला पाठवलेसुद्धा. तासाभरातच रिबेन्ट्रॉप ते वाचीत बसला होता.

आज २८ ऑक्टोबर. बर्लिनहून अजून काहीच समजले नाही. परराष्ट्र मंत्र्याने पत्राला केराची टोपली दाखवली असणार. कारण, हे पत्र पॅपेनचे. पॅपेनसाहेब व रिबेन्ट्रॉप यांचा उभा दावा. रिबेन्ट्रॉपला एकदा का कोणी डिवचला की अत्यंत सोप्या गोष्टीतही निर्णय घेणे दुष्कर!

आजचा दिवस तुर्कांच्या दृष्टीने महत्त्वाचा. आज त्यांचा राष्ट्रीय सण. अंकारा कशी तरुण युवतीसमान नटली होती. दररोजच्या कामाचा ढीग; त्यांतून पुन्हा योगायोग असा, की पॅपेनसाहेबांचा वाढदिवसही आजच; शिवाय टर्कीच्या महोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या पार्टीसही जायचे होते. साहजिकच त्या पत्राचा मला संपूर्ण विसर पडला.

सकाळीच पॅपेनचा वाढदिवस समारंभ झाला. सर्वांनी त्याला दीर्घायुरारोग्य चिंतले व मग तेथूनच टर्कीच्या अध्यक्षांनी नॅशनल अॅसेंब्लीत आयोजित केलेल्या पार्टीस गेलो. या तटस्थांच्या समारंभास आमचे मित्र व शत्रू यांनी सारख्याच उत्साहाने शोभा आणली. प्रत्येक देशाचे राजकारणी वैशिष्टयपूर्ण पेहेराव घालून व सर्वांच्या पुढे त्यांचा वकील अशा थाटात टर्कीश अध्यक्षांची भेट घेत होते. काही वेळानंतर आम्ही बाहेर पडलो. बाहेर जाता जाता माझी एका सद्‌गृहस्थांशी टक्कर झाली. थोडयाच वेळानंतर असे समजले की, तो सद्‌गृहस्थ म्हणजे ब्रिटिश वकील सर ह्यूज होत. हॉलच्या बाहेर येऊ लागलो, तेव्हा त्या ब्रिटिश राजकारण्यांची रांग माझ्याकडे डोळे वटारून बघत होती.

दुपारी रेसकोर्सच्या ग्राऊंडवर सैनिकी संचलन झाले. सर्वत्र मुत्सद्यांच्या झुंडीच्या झुंडी दिसत होत्या. डोकेबाज टर्किशांनी बसण्याची व्यवस्था अशी केली होती की एकमेकांचे भेटीचा योग शत्रु-मित्रांत कधीच नसावा. समोरच सैनिक डौलदार वेषासह, दिमाखात खाड् खाड् आवाज करीत संचलन करीत होते. आम्ही बेहद्द खुश होतो. अगदी जवळच शत्रुपक्षाचा कॅंप होता. त्यात बसलेले अनेक मुत्सद्दी दिसत होते. पण त्यांच्याकडे दृष्टी न जाईल याची खबरदारी घेत होतो. न जाणो उगाच गैरसमज व्हायचा.

समारंभ संपला. मी वकिलातीत गेलो व मला आश्चर्याचा धक्का बसला.

## पैसे रवाना

बर्लिनहून पत्र आले होते. ते असे होते—

" वकील श्री. फॉन पॅपेन यांस,

अत्यंत गुप्त

खबरदारी घेऊन त्या ब्रिटिश वकिलाच्या नोकराने दिलेली फिल्म स्वीकारावी. ३० ऑक्टोबरला दुपारच्या अगोदर खास विमान येत आहे. फिल्म्स् मिळताच त्वरित बातमी कळवावी– रिबेन्ट्रॉप."

३० ऑक्टोबरला माझ्या ऑफिसातील फोन खणखणला. मी रिसीव्हर उचलला.

"पिअरी बोलत आहे. काय हो काय समजलं काय बर्लिनहून ?" दुसऱ्या बाजूने अस्पष्ट आवाज आला.

"हो हो, होकार आलाय्." मी उत्तरलो.

"ठीक आहे, आज रात्री भेटतो." तो म्हणाला.

या वेळी माझी सेक्रेटरी स्नुर्शेन माझ्याकडे आश्चर्याने पाहत होती; कारण तिने रिसीव्हर उचलायच्या आतच मी तिच्याकडून हिसकावला होता. मग मी वकील-साहेबांना भेटायला गेलो.

"साहेब, त्या नोकरास मी आज रात्री भेटणार आहे."

"छान् छान्. पण छोकऱ्या फार काळजी घे बरं. काहीतरी लफडे असेल हो. आणि तसे असेल तर मी तुला कोणत्याही प्रकारचे संरक्षण देऊ शकणार नाही."

"साहेब, या बाबतीत मी बराच विचार केला आहे. मी अगदी सावध राहीन. आणि जर का भानगड उत्पन्न झाली तर त्यास मीच जबाबदार."

"ठीक आहे. हे घे पैसे. मोजून घे." ते म्हणाले. त्यांनी टेबलातून नोटांचे पुडके काढले व पुन्हा बजावले, "लक्षात ठेव, मला अगर तुलासुद्धा कोणत्याही प्रकारच्या गोत्यात आणू नकोस."

ते किंमतवान् पुडके घेऊन मी माझ्या ऑफिसात आलो व पैसे तिजोरीत ठेवले. सेक्रेटरीस घरी जाण्यास सांगितले. तिच्या भावना यामुळे दुखावल्या जातील, याची कल्पना असूनही मला दुसरा मार्ग नव्हता. कारण कोणत्याही प्रकारचा धोका मी घेऊ इच्छित नव्हतो.

"कृपया तिजोरीची दुसरी चावीही मला देशील काय? आजपासून त्याची मीच काळजी घेईन." नाइलाजाने मी म्हणालो.

तिने माझ्याकडे संतापपूर्ण कटाक्ष टाकला. "माझ्यावर तुमचा विश्वास नाही काय आता ?"

"स्नुर्शेन, हा विश्वास वा अविश्वासाचा प्रश्न नाही. घटनाच अशा घडत आहेत की, माझा नाइलाज आहे."

अत्यंत नाखुषीने तिने मजजवळ किल्ली दिली. रात्रीचे नऊ वाजले. मी वकिलातीत गेलो. खिडक्यांवरील पडदे खाली सोडले. दिवे मालवले. वकिलातीच्या माजघरात एक व्यावसायिक व अत्यंत विश्वासार्ह असा फोटोग्राफर बसला होता.

## □ ऑटोमॅटिक जमाना

कोणे एके काळी कष्ट आणि स्वावलंबनाचे खडतर युग होते, तेव्हा माणसाची सगळी भिस्त परमेश्वरावर होती. आजच्या ऑटोमॅटिक युगात ती बटणावर आहे. पूर्वी परमेश्वर सर्वशक्तिमान होता असे म्हणतात. आता बटण सर्वशक्तिमान आहे. कारण, आता बटण दाबले की काय होत नाही ? बटण दाबले की हजारो बेरीज–वजाबाक्या चुटकीसरशा होतात, बटण दाबले की माणसाच्या मनात राग, लोभ हुकमाने निर्माण करता येतात. इतकेच काय पण बटण दाबले की फट् म्हणता कवितादेखील होते. पण ही सगळी अशक्य कोटीतली कामे लीलया करणाऱ्या यंत्रांच्या जंजाळात सुई ओवण्याचे यंत्र का नाही असे एका वाचकाने नुकतेच एका वर्तमानपत्राच्या संपादकाला पत्र लिहून विचारले आहे.

लाखाची गोष्ट विचारली बेट्याने ! ऑफिसातून घरी यायला पाच–दहा मिनिटेच उशीर झाला तरी "बसले असतील त्या नखरेल मॉली पिंटोशी गुलगुल गोष्टी करीत ! सटवी मेली..." अशा सुतावरून स्वर्गाला जाणाऱ्या सौभाग्यवतीची समजूत घालण्यासाठी तेच सूत एका फटक्यात सुईत ओवून देणे किती कठीण आहे. हे कुठल्याही सुज्ञ नवऱ्यास सांगणे नलग. मला वाटते कविता करणारा कॉम्प्यूटर, चंद्राचा फोटो घेणारा कॅमेरा किंवा इंग्रजीत चाललेल्या अर्थहीन भाषणाचे तावडतोब फ्रेंच किंवा रशियन भाषेत तेवढेच अर्थहीन भाषांतर करणारा यांत्रिक दुभाष्या असली फालतू यंत्रे तयार करण्यापेक्षा सामान्य माणसाच्या– विशेषतः, सामान्य नवऱ्याच्या– उपयोगी पडतील अशी यंत्रे तयार झाली तर किती तरी चांगले होईल. उदाहरणार्थ, "आज किनई ग्रडे, तुमच्यासाठी शिरा केलाय" असे लाडिक शब्द उच्चारले गेल्याबरोबर त्या वाक्याचे तावडतोब "हुश्शार ! याचा अर्थ आज पंचवीस तारीख असूनही सिनेमा पाहायची लहर आली आहे," असे अर्थपूर्ण भाषांतर करू शकणारे यंत्र हवे, किंवा "काय बाई तरी बायकांचा पोरकट सोस ! प्रेमाबाईंच्या लग्नाला दहा वर्षे झाली तरी दर उन्हाळ्यात माहेरपण काही चुकत नाही..." याचा खरा अर्थ "यंदा काही झालं तरी मी जाणार, बजावून ठेवते..." असा होतो हेही त्या यंत्राला कळले पाहिजे.– जाऊ द्या ! मला पक्के माहीत आहे की असले एकही उपयुक्त यंत्र तयार होणार नाही. कारण माणूस सध्या चंद्रावर जाण्याच्या गडबडीत आहे– त्याला पृथ्वीवर माजलेल्या गोंधळाकडे लक्ष द्यायला फुरसत आहे कुठे ?

• • •

# प्रतिकाराची नाजुक कला
# जुदो

पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजच्या व्यायामगृहात एका हॉलमध्ये घातलेल्या गाद्यांवर विशिष्ट तऱ्हेचे पायघोळ पांढरे अंगरखे व विजारी घातलेले सुमारे पन्नास तरुण विद्यार्थी जोडीजोडीने समोरासमोर उभे राहून एका विशिष्ट पद्धतीने हालचाल करीत होते.

" ईझी बॉईज, ईझी . . . " त्यांच्याचसारखा पोषाख घातलेले, जाडचा बांध्याचे एक वयस्क गृहस्थ त्यांना उद्देशून म्हणाले, " कोणत्याही प्रकारे शरीराचा तोल ढळू देऊ नका. प्रतिस्पर्ध्यांच्या श्वासोच्छ्वासाचा अंदाज घ्या, आपल्या हाताचा त्याच्या अंगावर भार टाकून आपल्या डावांची त्यांना विनाकारण कल्पना येऊ देऊ नका. "

" पाहिलेत ना. . . ." हसतच आमच्याकडे वळून ते गृहस्थ म्हणाले, " जुदोमध्ये असेच बारीकसारीक गोष्टींना महत्त्व असते. अतिशय काळजीपूर्वक खेळावयाचा हा खेळ आहे. जुदो या जपानी शब्दाचा अर्थच आहे नाजूक प्रकार (जन्टल वे)."

शास्त्रशुद्ध जुदो शिकविण्याची हाताच्या बोटांवर मोजण्याएवढी जी काही केंद्रे भारतात आहेत त्यांतीलच पुण्याचे हे केन्द्र. आणि प्रत्यक्ष जपानात जुदोचा पाच वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केलेले भारतातील एकमेव जुदो तज्ज्ञ श्री. रघुनाथ दामोदर खानीवाले हे ते केन्द्र विनामूल्य चालवितात.

हे केन्द्र गेल्या शैक्षणिक वर्षापासूनच सुरू झालेले. पण एका वर्षभराच्या आत त्यांच्या विद्यार्थ्यांची एवढी तयारी झाली की, गेल्या मे महिन्यात हैद्राबाद येथे भरलेल्या अखिल भारतीय जुदो फेडरेशनच्या सामन्यांमध्ये खेळलेल्या केन्द्राच्या चारपैकी दोन विद्यार्थ्यांनी सुवर्णपदके आणि एकाने रौप्यपदक पटकविले.

श्री. खानीवाले हे जपानमध्ये जुदोचे एवढे शिक्षण घेतलेले भारतातील एकमेव तज्ज्ञ असले आणि गेल्याच वर्षी स्थापन झालेल्या ऑल इंडिया फेडरेशनच्या टेक्निकल कमिटीचे अध्यक्ष असले तरी त्यांचे नाव महाराष्ट्रातच काय, पुण्यातही केवळ हाताच्या बोटांवर मोजण्याएवढ्या लोकांनाच ठाऊक असेल. भारतीय व्यायाम प्रकार, धनुर्विद्या आणि जुदो या कलांमध्ये अतिशय वाकबगार असलेला आणि त्यांना संपूर्ण जीवन वाहिलेला हा गृहस्थ परोपरीचा प्रसिद्धिपराङमुख आहे.

**अघोरी पण नाजूकही**

वयाने पन्नाशी ओलांडलेले, लांबीला उंच व स्थूलांमध्येच जमा होणाऱ्या

श्री. खानीवाल्यांकडे पाहिले म्हणजे यांना कोणताही खेळ खेळता येईल की नाही याची शंकाच येते. परंतु आमच्यासमोर त्यांनी एक-दोन विद्यार्थ्यांशी खेळून त्यांना ज्या सहजतेने खाली लोळविले ते चापल्य पाहून आमच्या-बरोबरच त्यांच्या वर्गातील विद्यार्थीही चकितच झाले. नंतर मुलांना एक-दोन नवीन डाव शिकवून, त्यांची सवय करावयास लावून ते आमच्याकडे वळून म्हणाले,



श्री. खानीवाले

"दिसायला जरी हा खेळ अघोरी दिसत असला तरी तो फार नाजुकतेने आणि कौशल्याने खेळावा लागतो. आता हेच पाहाना... माणूस गैरसावध केव्हा असतो हे तुम्ही सांगू शकाल ?" ... त्यांनी एकदम सवाल टाकला.


मी गोंधळलेला बघून ते म्हणाले, "मीच सांगतो. श्वास बाहेर सोडत असताना माणूस साधारणत: गैरसावध असतो. जुदोमध्ये या गोष्टीला फार महत्त्व आहे. प्रतिस्पर्ध्याच्या नजरेत बघून त्याच्या श्वासोच्छ्वासाचा अंदाज घ्यायचा आणि त्याचा उच्छ्वास बाहेर पडत असताना त्यावर आपला डाव टाकायचा."

कितीही सामर्थ्यवान प्रतिस्पर्धी असला तरी त्याच्यापासून संरक्षण करून त्याला ताळचावर आणावयाचे कसे, याची जुदो ही कला आहे. शरीराचे काही भाग असे असतात की, त्यांवर हाताच्या पंजाने आडवा प्रहार करताच माणूस खालीच बसतो. उदाहरणार्थ, वरचा ओठ व नाक यांमधली जागा. प्रतिस्पर्ध्याच्या नाकपुड्यांत दोन बोटे खुपसून नाकावर अंगठा दाबला की काय बिशाद आहे त्याची हालचाल करण्याची ?

"पण हे डाव आम्ही फार पुढे शिकवितो. पायरी पायरीने डाव शिकवावे लागतात. सुरुवातीला आम्ही शिकवतो कुठल्याही तऱ्हेची दुखापत न होता सुखरूपपणे खाली पडायचे कसे..." श्री. खानीवाले सांगत होते.

## अमरावतीचे उत्तेजन

श्री. खानीवाले हे जुदोचे तज्ज्ञ असले तरी धनुर्विद्येचा त्यांचा अभ्यासही दांडगा. वास्तविक पाहता प्रथम ते जपानला गेले ते धनुर्विद्येचा उच्च अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या उद्देशानेच. ते मूळचे वऱ्हाडातील अमरावतीचे. तेथील सुप्रसिद्ध हनुमान व्यायाम प्रसारक मंडळात त्यांनी भारतीय व्यायाम प्रकारांमध्ये लहानपणापासूनच प्राविण्य मिळविले. त्यांची या विषयांमधील गती ओळखून मंडळाचे संचालक श्री. अं. कृ. वैद्य यांनी त्यांच्याकडून धनुर्विद्येचा अभ्यास करवून घेण्यास सुरुवात केली.



**फर्ग्युसन कॉलेजमधील व्यायाम-गृहात–**

उत्तमोत्तम तरुण मुलांना वेगवेगळ्या व्यायामप्रकारांमध्ये तरबेज करून त्यांना परदेशी पाठविण्याचा त्या वेळी ह. व्या. प्र. मंडळाचा उपक्रमच होता. त्यानुसार १९२८ साली मंडळाने ज्ञानेश्वर देशपांडे या तरुण विद्यार्थ्याला जपानमध्ये जुदोच्या उच्च अभ्यासासाठी पाठविले होतेच. १९३० च्या सुमारास श्री. खानीवाले यांना धनुर्विद्येच्या शिक्षणासाठी जपानला पाठविण्यात आले.

जपानमधील खिके गाकुईन या धनुर्विद्या शिकविणाऱ्या संस्थेमधील सहा महिन्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करून श्री. खानीवाले मायभूमीस परत येण्यास निघाले खरे. पण त्याच सुमारास ज्ञानेश्वर देशपांडे याचा खांदा निखळला. शिवाय त्याच वेळी जपानमध्ये रासबिहारी बसूंच्या नेतृत्वाखाली वावरणाऱ्या भारतीय क्रांतिकारक चळवळीत तो सामील झाला. पुढे त्याचा जपानमध्येच अंत झाला. त्यामुळे ह. व्या. मंडळाने श्री. खानीवाले यांनाच जुदोचा शिक्षणक्रम पूर्ण करण्यास सांगितले.

टोकियोमधील कोदो कान्ह या संस्थेत कॉलेजचे संस्थापक डॉ. जिगोरो यांच्या हाताखाली त्यांनी पाच वर्षे शिक्षण घेतले. जपानमधील अनेक सामन्यांत खेळून त्यांनी आपल्या संस्थेचे " ब्लॅक बेल्ट " व " थर्ड ग्रेड " हे बहुमान मिळविले.

१९३६ साली भारतात परत येताच ह. व्या. प्र. मंडळाच्या चमूबरोबर नायक म्हणून श्री. खानीवाले बर्लिन ऑलिंपिकबरोबर भरलेल्या स्पोर्ट्स् कॉंग्रेसमध्ये भाग घेण्यासाठी गेले. त्या दौऱ्यात त्यांनी सर्व युरोपभर भ्रमण केले व ठिकठिकाणी चमूने केलेल्या भारतीय व्यायामप्रकारांच्या प्रात्यक्षिकांत भाग घेतला.

युरोपातून परत येताच श्री. खानीवाले यांनी इचलकरंजी संस्थानात दोन वर्षे व फर्ग्युसन कॉलेजमध्ये एक वर्ष जुदोचे शिक्षक म्हणून काम केले. १९४३ पासून आजतागायत पुण्याच्या ते बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजमध्ये फिजिकल ट्रेनिंग डायरेक्टर म्हणून आहेत.

## संस्थात्मक प्रयत्न

-मागील वर्षी त्यांनी जुदोचा वर्ग सुरू केला तेव्हा वर्गात चाळीसच विद्यार्थी होते. यंदा ही संख्या ८० पर्यंत गेली. रोज सायंकाळी अवघा एक तासभर हा वर्ग चालतो.


जुदोसारखी कला साधारण सगळ्या तरुणांना थोडीफार तरी आली पाहिजे, असे श्री. खानीवाले यांना वाटते. ती स्वसंरक्षणाची एक अत्यंत प्रभावी कला आहे. ती जर तरुणांनी आत्मसात केली तर ते समाजात अधिक आत्मविश्वासाने वावरू लागतील, असे ते म्हणतात.

त्याबरोबर जुदोचे भारतीकरण झाले पाहिजे, असेही ते म्हणतात. जपान्यांनी पाश्चात्त्य आचार विचार, खेळ जसे आपलेसे करून टाकले, तसे जुदोचे झाले पाहिजे. जपानी खेळ म्हणून दुरून त्याचा उदो उदो न करता आपलेपणाने तो खेळला गेला पाहिजे, असे त्यांना वाटते.

वेगवेगळ्या खेळांचे मूळ, त्यांचा विकास व त्यांचे प्रकार यांची माहिती जमा करून ठेवण्याचा श्री. खानीवाले यांना मोठा छंद. या विषयावरची मोठी सामग्री त्यांनी जमा केली होती, पण १९६१ च्या पानशेतमध्ये त्यांची जुनी छायाचित्रे, त्यांनी जमविलेले धनुष्यबाण आणि घरातील सर्व सामान यांबरोबरच ही सामग्रीही वाहून गेली.

इतर पानशेतग्रस्तांप्रमाणेच त्यांनीही नवा संसार थाटला व त्याबरोबरच नव्या तडफेने ही सामग्रीही पुन्हा जमविण्याचा त्यांचा बेत आहे. महाराष्ट्रातील काही मित्रमंडळींच्या मदतीने महाराष्ट्र जुदो असोसिएशन या नावाची अखिल भारतीय जुदो फडरेशनच्या अधिकारक्षेत्रातील संस्था स्थापन करण्यामध्येही ते भाग घेत आहेत. लवकरच ही संस्था स्थापन होईल.

● ● ●



# रेक्सच्या जिवंत अभिनयाने परिपूर्ण झालेला
# माय फेअर लेडी

चित्रपटाचे चित्रण चालू झाले. आवश्यक ती जमवाजमव पूर्ण झाली सुरुवातीलाच कॉव्हेंट गार्डन फुलबाजाराचे काही क्लोजअप शॉटस् घ्यावयाचे होते. पण अमेरिकेत ऐन हिवाळा. फुले मिळणे कठीण व मिळाली तरी टिकणे कठीण; म्हणून कागदी फुले वापरावी असे सुचवण्यात आले. पण वास्तववादी चित्रपट निर्माण करण्यात हातखंडा असलेल्या जॉर्ज कुकर यांना हे पसंत नव्हते. आणि यावर उपाय म्हणून रोज ताजी फुले खास विमानाने ॲमस्टरडॅमहून स्टुडिओत मागवण्यात आली. चित्रण पूर्ण झाले. ' माय फेअर लेडी ' तील फुलांचे क्लोजअप्स बघताना मन हरपून जाते, त्यामागची कथा ही अशी.

बर्नार्ड शॉ च्या ' पिग्मॅलियन ' या नाटकावर आधारलेला हा संगीत चित्रपट १९६४ च्या उत्तरार्धात तयार झाला व तेव्हापासून तो जिथे जिथे लागला, तिथे तिथे मुक्काम ठोकून बसला. याच नाटकावर लेस्ली हॉवर्ड आणि वेंडी हिलर यांच्या भूमिका असलेला क चित्रपट १९३० साली तयार करण्यात आला होता. त्या वेळी ॲस्कॉट रेस व एम्बसी बॉल हे दोन्ही प्रसंग स्वत: शॉ यांनीच लिहिले होते, ते प्रसंग नवीन सिनेमात जसेच्या तसेच ठेवण्यात आले आहेत. पण बाकी सर्वच दृष्टीने जवळ जवळ दोन कोटी डॉलर्स खर्च करून तयार करण्यात आलेला हा चित्रपट अत्यंत सरस आहे. गतवर्षीची आठ ॲकॅडमी ॲवॉर्डस याला मिळालेली आहेत.

' उच्चार शास्त्रातील तज्ज्ञ प्रा. हिजिन्स हा ब्रह्मचारी असतो. एकांड्या स्वभावाचा असतो. केवळ आव्हान स्वीकारून रस्त्यावरच्या एका फुलवालीला चांगल्या तऱ्हेने बोलायला शिकवतो. आणि झाडूवाल्याची ही मुलगी राणीसाहेबांच्या नजरेसमोर आली असता आपल्या मार्दवपूर्ण चालीरीतींनी, आणि नाजुक बोलण्याने तिचे मन जिंकते. हे रूपांतर करण्याच्या खटाटोपातच हा प्रोफेसर नकळत तिच्यावर प्रेम करू लागतो.' अशा साध्या कथेवर आधारलेला हा चित्रपट वॉर्नर ब्रदर्सनी अतिशय परिश्रम घेऊन तयार केला आहे. चित्रपटाची सर्व तांत्रिक अंगे पूर्ण करण्याच्या प्रयत्नात त्यातील व्यक्तिरेखांना जराही धक्का लागणार नाही याची पूर्ण काळजी घेण्यात आली आहे. अर्थात ही जबाबदारी दिग्दर्शक कुकर व त्या त्या भूमिका करणाऱ्या नटनटींची.

चित्रपट पाहिल्यावर मनात ठसून राहतो तो प्रा. हिजिन्स. रेक्स हॅरीसनची ही भूमिका पाहिल्यावर हा नट केवळ याच भूमिकेसाठी जन्मला, असे वाटते. ज्या

नाटकावरून हा चित्रपट तयार करण्यात आला, त्या 'पिग्मॅलियन'चे जवळ जवळ दोन हजार प्रयोग झाले. पैकी एकट्या रेक्स हॅरीसननेच १००६ वेळा रंगभूमीवर प्रा. हिजिन्स उभा केला. आणि १००७ व्या वेळचा हिजिन्स, वॉर्नर ब्रदर्सच्या चित्रपटात कायम स्वरूपात करून टाकला.

चित्रपटात 'ॲलन जे लर्नर' चे मार्मिक संवाद रेक्सने असे काही ठासून म्हटले आहेत की, प्रा. हिजिन्स 'Why can't a woman be more like a man' म्हणू लागला की आपल्यालाही शंका यावी. खरोखरच या जगात काही तरी चुकते आहे. पण जग चुकत नसते. प्रोफेसर चुकत असतो व त्याला सरळ करण्यास इलायझा डूलीटल हवी असते.

## ऑड्रीची 'डूलिटल'

चित्रपटात जेवढे महत्त्व प्रा. हिजिन्सला तेवढेच महत्त्व फुलवाली इलायझा डूलिटलला आहे. रंगभूमीवर हे काम ज्यूली अँड्रयूज करत होती. तिला प्रचंड यश मिळाले होते व चित्रपटातील हे कामसुद्धा तिलाच द्यायला हवे होते. या स्वरूपाची टीका खूप ठिकाणी झाली होती. हे जरी खरे असले तरी ऑड्रीने उभी केलेली 'डूलिटल' ही खरोखरच अप्रतीम आहे. एका मुलाखतीत ती म्हणाली की, "ही भूमिका म्हणजे मला खरोखरीच एक आव्हान होते," या कामासाठी तिने तयारीही तशीच केली होती. फुलवालीची खेडवळ भाषा आत्मसात करण्याचा सराव केला. तशा मुलीचे लंडनच्या रस्त्यावर निरीक्षण केले. फुलवालीची अगदी सुरुवातीची गावरान भाषा, त्याला साजेसे हावभाव, हळू हळू तिचे 'लेडी'त होत असलेले रूपांतर, याच काळात प्रा. हिजिन्सबद्दल तिच्या मनात निर्माण झालेल्या प्रेमभावना हे सर्व बारकावे तिने अचूक टिपले आहेत.

चित्रपटाच्या यशात सिंहाचा वाटा असलेल्या दिग्दर्शक जॉर्ज कुकर यांची अशीच एक गोष्ट म्हणजे ट्रान्सिल्व्हानियाच्या राणीच्या भूमिकेसाठी नटीच्या निवडीचा प्रसंग. वास्तविक या राणीला पडद्यावर पाच मिनिटेसुद्धा काम नाही. पण जॉर्जना सर्व काही जातिवंत हवे. ते म्हणाले, "मला खरोखरच्या राणीचा चेहरा हवा होता. ती राणीसारखी चालली पाहिजे, बोलली पाहिजे, हे मला शिकवता आले असते, पण शिकवणे वेगळे व असणे वेगळे" म्हणून कुकर यांनी रोथरचाईल्ड घराण्यातील बॅरोनेस व्हेरॉनिका डी गोल्डस्मिड यांना हे काम करण्याची विनंती केली व त्यांनी ती मान्य केली.

ॲस्कॉट रेस व एम्बसी बॉल हे या चित्रपटातील प्रमुख प्रसंग. त्या वेळचा सगळा बेत सांभाळण्यास ३५ केशरचनाकार, २६ मेकअपमन्, व १७ स्त्रिया सगळ्या नटनटींची काळजी घेत होत्या.

एकूण १७० मिनिटे चालणारा हा चित्रपट तयार करण्याकरिता वॉर्नर ब्रदर्स दोन वर्षे मेहनत घेत होते.

●

# पहिली गुप्तहेर स्त्री

# मॉडेस्टी ब्लेज्

आजपर्यंत रुपेरी पडद्यावर अनेक पुरुष गुप्तहेर अवतरले आहेत. परंतु ट्वेन्टीएथ सेंच्युरी फॉक्स्च्या "मॉडेस्टी ब्लेज्" या आगामी चित्रपटात मॉडेस्टी ब्लेज् नावाच्या एका गुप्तहेर स्त्रीची कथा चित्रीत करण्यात आली आहे..

एकेकाळी अट्टल गुन्हेगार म्हणून गाजलेल्या मॉडेस्टी ब्लेज्ने नंतर गुप्तहेर म्हणून चांगलेच नाव मिळविले. तिला आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त झाली होती. एकदा सकाळी ती झोपेत असतानाच वँग या तिच्या चिनी नोकराने तिच्यासाठी ब्रेकफास्ट तयार करून आणला. तिच्या डोळ्यांवर झोपेची धुंदी होती. त्याच वेळी बाहेरच्या जगात खळबळ माजली होती. लंडन शहरात त्रेधा उडाली होती. इंग्लंडचे राणी सरकार तेलाच्या व्यापाराबाबत धोक्यात आले होते. अरब राष्ट्रांतून मिळणाऱ्या तेल सवलतीकरिता हिरे देण्याचा करार करण्यात आला होता. हे हिरे सुखरूपपणे पोचविण्याचेही आश्वासन देण्यात आले होते. त्याकरिता एक योजना आखण्यात आली होती. पण नेमके त्या योजनेलाच तडे गेले होते. आता मॉडेस्टी ब्लेज्ची मदत घेण्यावाचून गत्यंतर नव्हते. सिक्रेट सर्व्हिसच्या सर जिराल्ड टॅरंट यांनी या पडत्या काळात मदत करण्याचे आवाहन मॉडेस्टी ब्लेज्ला केले. आपल्याला विली ग्रॅव्हिन या आपल्या जुन्या मित्राबरोबर काम करण्याची परवानगी मिळाली तरच आपण मदत करू, असे मॉडेस्टीने सांगितले. तिची अट मंजूर करण्यात आली. बेडर वृत्तीच्या विली ग्रॅव्हिनच्या सहकार्याने या गोंडस, विषयासक्त, परंतु धाडसी यौवनेने हिरे घेऊन जाणाऱ्या जहाजावर पाय ठेवला. या जहाजावर असलेले हिरे हस्तगत करण्याची योजना गॅब्रिएल नावाच्या कुविख्यात आंतरराष्ट्रीय गुंडाने आखली होती. पाण्याखाली संचार करणाऱ्या सुसज्ज बोटीतून या जहाजाला खालून भोक पाडून त्यातून हिरे पळविण्याचा त्याचा डाव होता. परंतु गॅब्रिएलचा एक मनुष्य जखमी झाला. त्याची जागा घेणारा फक्त विलीच होता. त्याने विली व मॉडेस्टी यांना हिऱ्यांच्या भागीदारीचे आमिष दाखविले. एकदा त्याने या दोघांना कैद केले होते; परंतु मॉडेस्टीच्या जिवाला धोका असल्याचे पाहून विलीने चोरी करण्यास मदत करण्याचे कबूल केले. चोरीचा डाव यशस्वी होताच गॅब्रिएलने चोरलेले हिरे, मॉडेस्टी व विली यांना आपल्या बेटावर नेले. त्या बेटावर तटबंदी केल्याने परत सुटण्याची आशाच नव्हती; परंतु अरब व्यापारी व त्याचेच लोक हेलिकॉप्टर्समधून पॅराशूटच्या साहाय्याने विली व मॉडेस्टी यांच्या मदतीला धावून आले व गॅब्रिएलचा पराभव झाला.

अशा या धाडसी व मर्दानी भूमिकेकरिता मॉनिका व्हिट्टी या नाजुक, कोमलांगीची निवड केल्याबद्दल अनेकांना आश्चर्य वाटले. मॉनिकाला लोभसवाणी नायिका

# मॉडेस्टी ब्लेज्‌मध्ये
# मोनिका व्हिट्टी



म्हणून सर्वजण ओळखतात. तिच्या भूमिकांचा पिंड मॉडेस्टी ब्लेजूहून एकदम निराळ्या प्रकारचा होता. त्यात जमीन अस्मानाचा फरक होता.

१९६२ मध्ये लंडनच्या 'इव्हीनिंग स्टॅन्डर्ड'मध्ये पीटर ओ' डॉनेल यांनी मॉडेस्टीबद्दल लिहिले. त्यामुळे तिला खूप प्रसिद्धी मिळाली. तिचे धाडस, शौर्य, धैर्य, तिचा बेडरपणा, निडरवृत्ती, कल्पकता, युक्त्या, पराक्रम व बहुरंगी व्यक्तिमत्त्व यांचा चांगलाच बोलबाला झाला. त्यामुळे मोनिकासारखी सोज्वळ तारका त्या भूमिकेत कशी काय रमू शकेल अशी शंका अनेकांनी व्यक्त केली. परंतु प्रत्यक्षात मॉनिकालाच अॅन्टोनिओच्या नायिका पसंत पडल्या नव्हत्या, त्यामुळे निराळ्या प्रकारच्या मॉडेस्टीच्या भूमिकेत ती चांगलीच समरस झाली. 'मॉडेस्टी ब्लेज्'ची कथा वाचताच ती त्यात भूमिका करायला तयार झाली. तिला इंग्रजी भाषेचे विशेषसे ज्ञानही नव्हते. पण सहा महिनेपर्यन्त इंग्रजीचे शिक्षण तिने घेतले. ती सफाईदारपणे इंग्रजी बोलू शकली. तिचे इटालियन पद्धतीचे उच्चार मात्र तिला अद्याप टाळता आले नाहीत.

"मॉडेस्टी ब्लेज्"मध्ये मोनिका व्हिट्टीशिवाय, डर्क बोगार्ड, टेरेन्स स्टॅम्प यांच्याही भूमिका आहेत. जोसेफ लॉसे यांनी सदर चित्रपट दिग्दर्शित केला आहे.

—अशोक आंग्रे

# राशी भविष्य : श्री. बी. डी. घाणेकर : भृगुसंहितातज्ज्ञ

## दिनांक २५ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर १९६६

**मेष :** आपला राश्याधिपती दि. १ ऑक्टोबरला शुभ स्थितीत येत आहे. गेला महिना–दीड महिना आपणांस फारच त्रास सहन करावा लागला. या सप्ताहात तो त्रास संपुष्टात येत आहे. आता आपल्या बऱ्याचशा अडचणी दूर होऊन कार्ये सफल होतील. आर्थिक प्रश्न सुटून नवीन तऱ्हेने धनप्राप्ती होईल. कोर्टकामात यश. पत्नीच्या प्रकृतीस मात्र जपावे. दि. २७ व १ ह्या तारखा आपणांस जास्त शुभ आहेत. ज्यांचे आश्विन नक्षत्र प्रथम चरण असेल, त्यांना हा सप्ताह फारच शुभ आहे. संततीच्या प्रकृतीस उत्तम तऱ्हेने स्वास्थ्य लाभेल. येणे असलेले पैसे वसूल होतील. विद्यार्थ्यांना विद्येत उत्तमप्रकारे यश मिळेल. महिलांचे बाबतीत थोडे थांबा.

**वृषभ :** सावधान ! मंगळासारखा प्रखर ग्रह आपल्या सुखस्थानात आता ठाण मांडून बसणार आहे. त्यामुळे कौटुंबिक अडी-अडचणी, वरिष्ठांशी मतभेद, आहार-विहारात नियमितपणा ठेवा. प्रकृती बिघडण्याचा संभव. खर्चाची परिस्थिती निर्माण होऊन ऋण होण्याचा संभव आहे. कुठल्याही प्रलोभनाला बळी पडू नका. स्वकीयांच्या मनोकामना पूर्ण करता येणार नाहीत, म्हणून घरात वादविवाद व कलह निर्माण होतील. संततीबद्दल दक्षता घ्यावी.

**मिथुन :** धनस्थानात गुरू उच्च व त्याच्या जोडीला पराक्रमात मंगळ येत असून त्याच्या जोडीला आपला राशीस्वामीही पंचमात येत आहे. अशी ग्रहांची स्थिती असल्याने आपणांस कशाचीही कमतरता नाही. ' यत्न तो देव जाणावा ' या वचना-प्रमाणे आपण आता कोणत्याही अवघड गोष्टी सहजरीत्या सोडवाल. कवी, लेखक, नाटच-चित्र व्यावसायिकांना हा सप्ताह फारच शुभ आहे. मित्रांचे सहकार्य मिळेल. उद्योगव्यावसायिकांना सप्ताह अनुकूल जाईल. पत्नी, मुले–बाळे मनाजोगती वागतील. काव्यस्फूर्ती येईल. दिनांक २९ आणि १ ह्या तारखा जास्ती शुभ. मनात योजलेले कोणतेही कार्य या आठवड्यात पूर्ण होणार असल्याने ती कामे आत्ताच हाती घ्या. विद्यार्थ्यांना हा आठवडा शुभ आहे. नोकरीत बढती व फायद्याचा योग.

**कर्क :** लग्नी गुरू, पराक्रमात रवी व सुखात बुध अशी ग्रहरचना या सप्ताहात आहे. त्यामुळे आपल्या मानसिक इच्छा–आकांक्षा परिपूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. दि. २९ व ३० हे दिवस आपणांस फारच शुभ आहेत. ऑक्टोबरच्या पहिल्या सप्ताहात मात्र कौटुंबिक व पत्नीस त्रासाचा योग. नवीन वस्तूंची खरेदी कराल. विलासात पैसे खर्च होतील. वरिष्ठांची मर्जी प्राप्त होऊन नोकरीत बढतीचा योग. २७, २८ प्रतिकूल असल्याकारणाने जपून राहा. बाकी एकंदरीत हा सप्ताह आपणांस चांगलाच अनुकूल आहे.

सिंह : गेले महिना–दीड महिना आपण फार वैतागलात. तो त्रास दिनांक १ पासून संपत आहे. तथापि, ऑक्टोबरच्या पहिल्या सप्ताहानंतर आपणांस काळ जास्ती शुभ. या सप्ताहात आपणांस उष्ण पदार्थांच्या सेवनापासून, अग्निपासून व उष्ण विकारांपासून जपावे लागेल. अष्टमात शनी व द्वादशात गुरू या दोन ग्रहांची प्रतिकूलता मात्र आहे. त्यामुळे कोणत्याही कार्यात सहजगत्या यशप्राप्ती नाही. अडचणी निर्माण होतील. गेल्या महिन्या-दीड महिन्याच्या ग्रहमानाशी तुलना करता हा सप्ताह दगडापेक्षा वीट मऊ, इतकाच आहे. विद्यार्थ्यांना विद्येतील यशप्राप्ती-करता एकंदरीत या वर्षभरातच फार काळजी घ्यावी लागेल.

कन्या : या सप्ताहात आपणांस मंगळासारखा तेजस्वी ग्रह प्रतिकूल येत आहे. त्यामुळे कोणतेही कार्य सावधानतेनेच केले पाहिजे. रवि–गुरूच्या अनुकूलतेमुळे आपण अडचणींतून निभावून जाल. स्थावरासंबंधी व इतर बाबतींतील कोर्टकामे लांबणीवर टाकावीत. किरकोळ व्यवहारात वादविवाद निर्माण होऊन मन चिंता-ग्रस्त होईल. परंतु मनःक्षोभ होऊ देऊ नका. दिनांक १ ईश्वर–चिंतनात घालवा. कोणत्याही नवीन घडामोडी करू नका. मित्रांपासून फसवणूक होण्याचा योग. आपल्या वडिलांचे स्मरण करून त्यांचे ध्येय डोळ्यांपुढे ठेवा. म्हणजे निश्चित मार्ग मिळेल. तथापि २९–३० हे दिवस आपणांस काही प्रमाणात अनुकूल आहेत.

तूळ : या सप्ताहात आपला धनाधिपती लाभस्थानात आहे. त्याच्या जोडीला गुरू अनुकूल आहेच. त्यामुळे हा सप्ताह आपणांस अनुकूल आहे. प्रकृतीस मात्र जपावे. ज्यांचे विशाखा नक्षत्र तृतीय चरण असेल त्यांना मानसिक व कौटुंबिक त्रास होईल. पत्नीच्या इच्छेकरिता मात्र अकारण द्रव्यखर्च होईल. गृहलक्ष्मी मात्र सुखात असल्याखेरीज आपणांला कसे समाधान होणार ? दिनांक ३१, १ प्रवासाचा योग. व्यवसायात व्यापाऱ्यांना अनुकूलता आहे. २९ व १ ह्या तारखा आर्थिक फायद्याच्या आहेत. अकस्मात लाभाचा योग. नोकरीत बढतीचाही योग. या सप्ता-हात आपल्या खिशात पैसे सारखे खेळत राहतील. संततीच्या बाबतीत ऑक्टोबरच्या पहिल्या तारखेपर्यंत अधून-मधून त्रासाचा योग. कलावंत, नाटचचित्र–व्यवसायिकांना हा सप्ताह तसा अनुकूल नाही.

वृश्चिक : गुरू महाराजांची अनुकूलता व त्याच्या जोडीला दशमात मंगळ व इतर ग्रहांचेही साहाय्य. म्हणजे लाथ माराल तेथे पाणी काढाल, असा हा सप्ताह आहे. सर्व लोक आपली वाहवा करतील. सर्व ग्रहांची अनुकूलता म्हणजे ईश्वरी कृपाच ! जे काय करायचे असेल ते आत्ताच करून घ्या. कारण, असा अनुकूल काळ क्वचितच येतो. विद्यार्थ्यांना उत्तम तऱ्हेने यशप्राप्ती. मुले व पत्नी मनाजोगती वागतील. घरात आनंदी वातावरण. साहजिकच आहे, आर्थिक स्थिती उत्तम असल्यावर कोण मनासारखे वागणार नाही ? प्रियकर-प्रेयसींमध्ये कितीही विरोध आला तरी मनोकामना पूर्ण होतील.

**धनू :** या सप्ताहात आपणांस मंगळ अनुकूल येत आहे. त्यामुळे हळूहळू परिस्थितीत सुधारणा होत आहे. आता प्रयत्नाला वाव आहे. आता आपणांस वरिष्ठांचे सहकार्य प्राप्त होऊन नोकरीत बढतीचा योग येईल. जे लोक आपली निंदा करीत होते, त्यांना आपली सत्यता पटून ते तुम्हांला मानू लागतील. अकारण आलेले दोषारोप दूर होतील. रुपयातले १० आणे तरी प्रयत्नात यश येईल. संततीच्या विद्येत व आरोग्यविषयात दक्षता घ्यावयास पाहिजे. सासुरवाडीकडून मदत मिळण्याचा योग आहे. दिनांक १ आपणांस शुभप्रद आहे. व्यापाऱ्यांना व्यापारात लाल किंवा पिवळ्या रंगांच्या पदार्थांपासून धनप्राप्ती भरपूर होईल. स्थलांतर होऊन अर्थप्राप्तीचा योग आहे. सांसारिक अडचणी दूर होऊन महिलांना स्थैर्य मिळेल.

**मकर :** या सप्ताहात आपणांस मंगळ प्रतिकूल येत आहे. त्यामुळे कोणत्याही कार्यांत सावधगिरी बाळगावयास पाहिजे. प्रवास शक्यतो टाळावा. प्रेमिकांनो, सावधान! जोडीदार गोड वचने देऊन आपणांस फसवू पाहत आहे. बोलण्यात संयम ठेवा. अन्यथा अकारण दोषारोप होण्याचा संभव आहे. दिनांक १ कनिष्ठ लोकांपासून त्रास व मानसिक अस्थिरता. संयमाने व धीरानेच हा सप्ताह काढावयास पाहिजे. दिनांक २९, ३० शुभ दिवस. याच दिवशी कोणत्याही कार्याकरिता बोलाचाली किंवा प्रयत्न करणे इष्ट. कारण त्यात थोडेसे यश मिळविण्याचा संभव. सर्व संकट निवारणार्थ विघ्नहर्त्या गणेशाची उपासना करावी.

**कुंभ :** आपला राशीस्वामी वक्रस्थितीत आहे व त्याच्या जोडीला मंगळासारखा सेनापतीग्रह बंड पुकारून उभा आहे. त्यामुळे काय करू आणि काय करू नको अशी मनाची बेचैन अवस्था निर्माण होईल.

परमेश्वराची उपासना जोरकस करणेच इष्ट. उपासनेने संकटे सुसह्य होतात. सर्व प्रयत्न थकल्यानंतर ईश्वराखेरीज दुसरा आधारच नाही. धीर सोडू नका. तो विघ्नहर्ता परमात्मा आपली सर्व संकटांतून हळू हळू मुक्तता करील. तथापि २९ व ३० तारखा शुभ. थोडेफार यश मिळेल.

**मीन :** आपल्या राशीवर गुरुमहाराजांची पूर्ण कृपा आहे तथापि, या सप्ताहात व्ययस्थानात शनिमहाराज वक्री व षष्ठात मंगळ. म्हणून कौटुंबिक अडीअडचणी, नोकरीत वरिष्ठांशी वादविवाद, मानहानी इत्यादी घटना घडतील. ज्यांच्याशी आपला संबंध येईल त्यांना, तुझे म्हणणेच बरोबर आहे, असे म्हणणेच इष्ट होईल. वादविवाद करण्यात अर्थ नाही; कारण त्याने अनर्थ उद्भवेल. सुसरीबाई तुझीच पाठ मऊ, असे म्हणून वागणेच इष्ट होईल. आपण सत्प्रवृत्त व न्यायी आहात हे खरे पण —

वक्त पडे बाका तो गधेको कहना पडता है काका !

अशी स्थिती आहे. दिनांक २९ व ३० फार शुभ. २७, २८ प्रतिकूल.

• • •

[ 'माणूस 'चे मुद्रक : पृष्ठ ७ वरून ]

ठरला होता. वर्षा-दोन वर्षातच पटवर्धनबंधूंचा पुतण्या-मुंबईचे म्युनिसिपल कमिशनर श्री. जनार्दन हरी पटवर्धन यांचा मुलगा चि. सुजित आपला इंग्लंडमधील ऑफसेट छपाई तंत्राचा प्रगत अभ्यास-क्रम संपवून परतल्यावर तर 'संगम 'चा विस्तार अधिकच झपाट्याने होईल. कोथरूडजवळ २-३ एकर नवीन जागेची खरेदी झालेली आहे. २-३ वर्षांत 'संगम 'चे या नव्या जागेत, नव्या इमारतीत स्थलांतर करण्याच्या योजना आखल्या जात आहेत.

आणि कामगार-कर्मचारीवर्गही असाच विविध भाषी, भिन्नभिन्न धर्माचा. 'संगम 'च्या ग्राहकवर्गाला अनेक भाषांचे ज्ञान आपो-आप होत असते. राव-शिवगुरुंचे दाक्षिण भारतीय इंग्रजी, पुंडे-मराठ्यांचे दणकेबाज मराठी-इंग्रजी, नायडू-भय्यांचे हिंदी-मराठी, सातपुते-डहाळ्यांचे अस्सल पुणेरी मराठी—अनेक आवाज तऱ्हे-तऱ्हेचे शब्दप्रयोग ग्राहकाच्या सेवेला हजर असतात. आणि हें बहुढंगी स्वागत कमी होते की काय, या शंकेने मध्येच माधवराव पटवर्धनांची जोरदार आरोळी वातावरण कापीत उठते, '' कोण आहे रे बाहेर ! अरे काय चाललं आहे काय ! आमच्या चहा-पाण्याची व्यवस्था करायला कोणी जिवंत आहे की नाही ? त्या झेंड्याला कान धरून माझ्यासमोर आणा ''...झेंडे कपाचा कान धरून अर्ध्याएक तासात, हसतमुखाने पुढे येतो आणि माधवरावांच्या खोलीतील गिऱ्हाइकांची संख्या तोवर चाराची सहावर गेलेली असते. पुन्हा धावपळ, उद्धार. माधवरावांच्या रसवंतीचा नवा बहर...

पुणे-मुंबई रस्त्यावर पसरलेल्या नव्या कारखानदारीने व्यव-सायाची खूप नवी दालने उघडली जात आहेत याची तीव्रतेने जाणीव झालेला प्रेस म्हणून 'संगम 'कडेच बोट दाखवावे लागेल. या जाणिवेमुळे 'संगम 'चा अनेकांगी विकास तर होतो आहेच, पण पुण्यातील इतर मुद्रकांनाही या नव्या संधी राबवण्याची उमेद वाटू लागली आहे. नुकतेच पुण्यात 'Poona Can Print ' हे प्रदर्शन भरवण्यात आले. कारखानदार मंडळींना

हवी त्या प्रकारची, हव्या त्या दर्जाची छपाई पुण्यातही होऊ शकते, त्यासाठी मुंबईकडे धाव घेण्याची गरज नाही, हे कारखानदारांच्या निदर्शनास आणण्यासाठी पुण्यातील मुद्रकांनी हा उपक्रम योजला होता. श्री. पमासाहेब पटवर्धन यांचा या उपक्रमातील वाटा मोठाच होता. पुण्यातील मुद्रकांचे मासिक मुखपत्र 'मुद्रण-प्रकाश'ची संपादकीय व इतर जबाबदारीही नुकतीच 'संगम'च्या चालकांकडे आली आहे. या मासिकाचा जो कायापालट पटवर्धनबंधूंनी २-४ अंकात केला तो त्यांच्या नव्या दृष्टीची साक्ष देण्यास पुरेसा ठरावा.

दोन बंधूंपैकी एक थोरले पमासाहेब आहेत व्यवस्थापनकुशल; १९६१ मध्ये ते याच विषयाच्या अधिक अभ्यासासाठी देशातील इतर काही नामवंत मुद्रकांबरोबर परदेशदौराही करून आलेले आहेत. मॅनेजमेंट टेक्निक्स, टाईम-मोशन-स्टडी, वगैरे विषयांवरील जाडजूड ग्रंथ, विविध छपाईचे शेकडो नमुने त्यांच्या तिसऱ्या मजल्यावरील खोलीतील टेबलावर व्यवस्थितपणे मांडून ठेवलेले असतात. धाकटे माधवराव म्हणजे !... छे: 'वल्ली' हा शब्द फिका वाटावा अशी ही व्यक्ती. म्हटलं तर चोवीस तास प्रेस डोक्यात. पण केव्हा नाटक-गाण्याची किंवा सहलीची सुरसुरी येऊन प्रेसमधून 'मोकळे' होतील याचा भरंवसा नाही. सध्या ते अशाच लांब सहलीवर गेले आहेत. दिल्ली-आग्र्याकडे. माहिती व नभोवाणी खात्यामार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या अ. भा. मुद्रण स्पर्धेमध्ये यंदा 'संगम' प्रेसला पुस्तक-छपाई विभागात गुणवत्ता प्रशस्तिपत्रकाचा बहुमान लाभला आहे. पुस्तकाचे नाव आहे, 'एका कोळियाने.' प्रकाशक आहेत रा. ज. देशमुख. दोघेही बहुमानाचा स्वीकार करण्यासाठी दिल्लीला गेल्या आठवड्यात गेले; पण देशमुख परतले; माधवरावांची सहल सुरू आहे. किंबहुना या सहलीच्या आकर्षणामुळेच माधवरावांचा पाय प्रेसमधून बाहेर पडला असावा. कारण दिल्लीचा असाच एक बहुमान १९६१ साली एका इंग्रजी पुस्तकाच्या छपाईबद्दल 'संगम' प्रेसला यापूर्वी मिळालेलाच होता. त्या वेळी माधवरावांचा मुक्काम काही प्रेसमधून हलला नव्हता.


'संगम' असाच मोठा होवो. 'संगम'च्या या यशाचे अभिनंदन. ○



'संगम'चे माधवराव...
'प्रेस' परिवारांत.... श्री. जनुभाऊ
श्री. पमासाहेब व चि. सुजित



MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**